www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118




■ सिध्देश्वर तलाव परिसरात साफसफाई स्वच्छतेविषयी जनजागृतीवर भर...

पान ३ वर....

# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा प्रकल्पाच्या दुस-या टप्प्याचे ९०...

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १८७ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, सोमवार, ०९ डिसेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

# अजित पवारांना डबल दिलासा, उपमुख्यमंत्री पदी शपथबद्ध आणि मालमत्तेवर टाच आणण्याचा आदेश रद्द

● मुंबई, राकेश गायकवाड :

महायुती सरकारच्या शपथविधीच्या दिवशीच उपमुख्यमंत्री अजित पवार यांची खऱ्या अर्थाने चिंता मिटली आहे. उपमुख्यमंत्री पद तर मिळालेच पण अजित पवारांशी संबंधित कारखान्याच्या मालमत्तेवर टाच आणण्याचा आदेश दिल्लीतील लवादाने रद्द केल्याने त्यांना दुहेरी लाभ झाला. पहाटेच्या शपथविधीनंतर सिंचन घोटाळ्यात अभय तर महायुती सरकारमधील शपथविधीच्या दिवशीच शेकडो कोटींच्या मालमत्तेवरील टाच उठली आहे. यावरून विरोधकांनी टीका केली आहे.

अजित पवार विरोधी पक्षात असताना सातारा जिल्ह्यातील जरंडेश्वर साखर कारखान्याची मालमत्ता लिलावात खरेदी करण्यावरून ईडी व प्राप्तिकर विभागाने कारवाई केली होती. अजित पवार यांच्या भगिनींच्या निवासस्थानी तीन दिवस छापे पडले होते. जरंडेश्वर साखर कारखान्याची मालमत्ता अजित पवार यांच्या नातेवाईकांनी खरेदी केल्याचा आरोप झाला होता. त्या दृष्टीने ईडी



व अन्य यंत्रणांनी तपास केला होता. लिलावात हा कारखाना ताब्यात घेणाऱ्या कंपनीने बेनामी कंपन्यांच्या माध्यमातून पैसे उभे केल्याच आरोप झाला होता. अजित पवार यांचे जवळचे नातेवाईक , त्यांच्या निकटवर्तीयांशी संबंधितांकडून हा कारखाना चालविण्यास घेण्यात आला होता. तसेच अजित पवार हे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक असताना कारखाना चालविणाऱ्या कंपनीला सुमारे ७०० कोटींचे कर्ज मंजूर झाले होते याकडे केंद्रीय यंत्रणांनी लक्ष वेधले होते. जरंडेश्वर साखर कारखान्याची मालमत्ता खरेदी केलेल्या कंपनीशी अजित पवार व त्यांच्या कुटुंबीयांचा थेट संबंध असल्याचे ईडीला आढळले होते.

### लवादाचे निरीक्षण काय?

■ अजित पवार, पत्नी सुनेत्रा आणि पुत्र पार्थ यांनी मालमत्ता खरेदीसाठी बेनामी व्यवहार केल्याचा आरोप झाला होता. यातूनच पुढे जरंडेश्वर साखर कारखान्याच्या मालमत्तेवर आयकर विभागाने टाच आणली होती. या विरोधात दाखल झालेल्या अपिलावर 'दी स्मगलर्स ॲण्ड फॉरेन एक्सचेंज मॅन्यूप्लेटर्स' कायद्याअंतर्गत लवादाने टाच आणण्याचा आदेश रद्द केला आहे. केंद्रीय यंत्रणेने दाखल केलेले अपील लवादाने फेटाळून लावले. अजित पवार, सुनेत्रा पवार वा पार्थ पवार यांनी कथित बेनामी मालमत्ता खरेदीसाठी पैसे पुरविल्याचा फिर्यादी पक्ष पुरावा सादर करू शकलेले नाही, असे लवादाने निरीक्षण नोंदविले आहे.

**एक हजार कोटींची मालमत्ता मोकळी**

लवादाच्या निर्णयामुळे अजित पवार व त्यांच्या कुटुंबीयांची सुमारे एक हजार कोटींची मालमत्ता आता मोकळी झाली आहे.

पान २ वर

## () थोडक्यात ()



### बावधन परिसरात दुकानाला लागलेल्या भीषण आगीत, हवेत दूरवर पसरले धुरांचे लोट

पुणे - पुण्यातील बावनधन परिसरातील एका दुकानाला भीषण आग लागलीय. आग शमविण्यासाठी अग्नीशमन दलाच्या ४ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. आग कशामुळे लागलीय याचे कारण अद्याप कळू शकले नाहीये. बावधनमधील शिंदे नगर येथे असलेल्या दुकानात आग लागलीय. आग शमविण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

### १५ कोटी दिले, तर राज्यपाल करतो सांगत केली एकाची फसवणूक



नाशिक : राजकीय नेतेमंडळींशी आपली ओळख असून कोणत्याही राज्याचे राज्यपालपद मिळवून देऊ शकतो, अशा भूलथापा देत एकाने तामिळनाडूस्थित व्यक्तीकडे सेवा शुल्कापोटी १५ कोटींची मागणी करुन सुमारे पाच कोटी नऊ लाख रुपये घेत फसवणूक केली. या प्रकरणी पोलिसांनी संशयिताला अटक केली असून न्यायालयाने त्याची पोलीस कोठडीत रवानगी केली.

## मालमत्तेच्या वादातून ३६ वर्षीय व्यक्तीची हत्या, दोघांना अटक

● मुंबई, यश सावंत :

मालमत्तेच्या वादातून ३६ वर्षीय पुतण्याची हत्या केल्याप्रकरणी वांद्रे पोलिसांनी दाम्पत्याला अटक केली. आरोपी हबीबूर रेहमान खान (५६) याच्यासह त्याची पत्नी सना खान (३६) यांचे मृत व्यक्तीच्या कुटुंबासोबत शनिवारी भांडण झाले होते. त्यातून आरोपी हबीबूरने बांबूने हल्ला केला होता. हबीबूरविरोधात यापूर्वी पाच गुन्हे दाखल आहेत. याशिवाय दोनवेळा त्याच्याविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

वांद्रे पश्चिम येथील खोजा कब्रिस्तानजवळील परिसरात शनिवारी ही घटना घडली. मृत व्यक्ती कामरान फैजल रेहमान खान (३६) व्यवसायाने रिक्षा चालक होता. तो कुटुंबियांसोबत वांद्रे पश्चिम येथील गॅलेक्सी चित्रपतगृहाजवळील खान हाऊस येथे कुटुंबियांसोबत राहत होता. आरोपी हबीबूर व त्याची दुसरी पत्नी सना खानही त्याच परिसरात राहते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत कामरान, त्याची बहीण तोती व गुड्डी तसेच भाचा सादीक याच्यासोबत आरोपी हबीबूर व सना यांचे शनिवारी भांडण झाले. त्यानंतर संतापलेल्या हबीबूरने बांबू कामरानच्या डोक्यात मारला. त्यात तो खाली कोसळला. त्याला तातडीने वांद्रे येथील भाभा रुग्णालयात दाखल केले असता त्याचा मृत्यू झाला.

याप्रकरणी पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली असता हबीबूरने कामरानच्या डोक्यात बांबू मारल्याचे समजले. कामरानच्या डोक्यावर गंभीर दुखापत झाली, त्यात त्याचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अहवालातून स्पष्ट झाले आहे. त्यानंतर पोलिसांनी हबीबूर व त्याची पत्नी सनाविरोधात हत्या, मारहाण, धमकावणे अशा कलमांतर्गत गुन्हा दाखल करून अटक केली. सनानेही कामरानचा भाचा सादीकला मारहाण केल्याचे पोलिसांनी सांगितले.

## भाजप शिंदेसेनेला गृहखातं देणार नाही?

● मुंबई, विशाल कारंडे :

राज्यात सरकार स्थापन झाले असले तरीही खातेवाटप रखडलं आहे. कोणत्या पक्षाला किती आणि कोणतं खाते मिळणार याकडे अवघ्या राज्याचं लक्ष आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्रीपदावर अडून होते, परंतु त्यांना उपमुख्यमंत्रीपदी देण्यात आलं. तर, दुसरीकडे ते गृहखात्यावरही अडून आहेत, असं सांगितलं जातंय. दरम्यान, भाजपा गृहखातं सोडण्यास तयार नसल्याचं वृत्त आहे. गृहखात्याच्या मोबदल्यात त्यांना महसूल, नगरविकास आणि सार्वजनिक बांधकाम खाते भाजपाने देऊ केले आहेत. तर, अजित पवारांकडे आधीच वित्तखातं आहे.

भाजपामधील उच्चपदस्थ सूत्रांनी सांगितले की, "भाजपाने आपला मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेला गृहमंत्रालय देऊ शकत नसल्याचे स्पष्ट केले आहे." ५ डिसेंबर रोजी, भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान



नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मुंबईतील आझाद मैदानावर मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यांच्याबरोबर शिंदे आणि पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले की, "१६ डिसेंबरपासून नागपुरात सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळाचा विस्तार होणार आहे. ७ ते ९ डिसेंबर या तीन दिवसीय विशेष अधिवेशनाच्या समाप्तीनंतर मंत्रिमंडळाचा विस्तार केव्हाही होईल, असे संकेत भाजपाच्या सूत्रांनी दिले.

एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपद सोडल्याने त्यांना गृहखातं मिळावं अशी मागणी शिवसेनेकडून केली जात आहे. गुलाबराव पाटील, संजय शिरसाट, भरत गोगावले यांच्यासह अनेक शिवसेनेच्या नेत्यांनी शिंदे यांना गृहमंत्रिपद मिळावे, अशी आग्रही मागणी केली आहे. तर, २८८ पैकी १३२ जागा जिंकणारा सर्वात मोठा पक्ष असलेल्या भाजपाने गृहमंत्रालय आणि मुख्यमंत्रिपदावर आपला हक्क सांगितला आहे. शुक्रवारी माध्यमांना फडणवीस म्हणाले, "केंद्रात भाजपाच्या नेतृत्वाखाली आमचे सरकार आहे. दिल्लीत केंद्रीय गृहमंत्रालय भाजपा (अमित शाह) कडे आहे. त्यामुळे एकाच पक्षाकडे गृहमंत्रिपद कायम ठेवल्याने समन्वय साधण्यास मदत होते."

भाजपाच्या नेत्याने सांगितले की, "फडणवीस यांनी त्यांच्या पहिल्या कार्यकाळात (मुख्यमंत्री म्हणून) गृहखातेही सांभाळले आणि काही धाडसी सुधारणा केल्या." भाजपाकडे १८ ते २०, शिवसेनेकडे १२ ते १४ आणि राष्ट्रवादीकडे ९ ते ११ मंत्री असतील, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

पान २ वर

## राज ठाकरेंची हवा गेली, महायुतीला त्यांची गरज नाही - रामदास आठवले

● नाशिक, सचिन कदम :

महायुतील घटकपक्ष असलेल्या रिपाइं पक्षाचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी राज ठाकरेंसंदर्भात मोठं विधान केलंय. महायुतीला राज ठाकरेंची गरज नसल्याचं म्हणत आठवलेंनी राज ठाकरेंना टोला लगावलाय. तसेच महायुतीत मनसेच्या समावेशाला त्यांचा विरोध असल्याचं त्यांनी स्पष्ट केलंय. राज ठाकरेंना महायुतीत घेण्यात फायदा नाही. मी असताना त्यांची काय गरज, असं रामदास आठवले म्हणालेत. रामदास आठवलेंनी केलेल्या विधानामुळे मनसे आणि महायुतीतील



दुरावा वाढण्याची शक्यता आहे.

दरम्यान एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना देवेंद्र फडणवीस यांनी बीएमसीच्या निवडणुकीसाठी मनसेसोबत युती करू, असं म्हटलं होतं. त्यावरून पत्रकारांनी रामदास आठवले यांना विचारला होता. त्यावेळी त्यांनी राज ठाकरेंना टोला लगावला. रामदास आठवले हे नाशिक दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी पत्रकार परिषद घेतली. विधानसभा निवडणुकीनंतर आठवले पहिल्यांदा नाशिक दौऱ्यावर आलेत. यावेळी त्यांनी महाविकास आघाडीवर टीका केली.

आठवले म्हणाले की, नाशिक दौऱ्यावर आलो विधानसभा निवडणूक रणधुमाळी संपल्यावर आलो. लोकसभेला नुकसान झाले विधानसभेला यश आले. आरक्षण जाणार हे सांगणाऱ्यांना मतदारांनी उत्तर दिलंय. लाडकी बहिण महिलांनी मतदान केले. संविधान हे राजकारण पलीकडे आहे. संविधान कोणाच्या बापाला बदलता येणार नाही.

मुख्यमंत्रिपदाची त्यांच्यात महाविकास आघाडीत रेस होती. आमच्या तिन्ही नेत्यांनी सांगितले आम्ही रेसमध्ये नाही. नाशिकमध्ये सर्वात मोठी धम्म परिषद घेणार असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली. दरम्यान मंत्रिमंडळ विस्तार लवकर करावा, अशी मागणी आपण महायुतीच्या मित्रपक्षांकडे केलीय. आम्हाला दोन मंत्री पद मिळणार असल्याचं महायुतीच्या पक्षांकडून सांगण्यात आल्याचं आठवले म्हणाले. भूमीहिन लोकांना पाच एकर जमीन देण्याचा निर्णय घ्यावा ही मागणी केल्याचं रामदास आठवले म्हणालेत.

पान २ वर



ठाणे महानगरपालिकेच्यावतीने संत संताजी जगनाडे महाराज यांच्या जयंतीनिमित्त महापालिका मुख्यालय येथील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यावेळी, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपूरे आणि माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर तसेच महापालिकेचे कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

### देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधीनंतर मुंबईतून १ हजार ९६३ बॅनर्स, झेंडे काढले

मुंबई - मुंबईतून काढण्यात आले १ हजार ९६३ बॅनर्स आणि झेंडे मुंबई महापालिकेने देवेंद्र फडणवीस शपथविधी सोहळा आटोपल्यानंतर दोन दिवसांनी शहरातून १ हजार ९६३ बॅनर्स, फोटो, अभिनंदाचे फलक आणि झेंडे आता काढले आहेत. यातले ७६६ बॅनर्स हे एकट्या आझाद मैदान परिसरात होते. त्यामुळे १ हजार ९६३ बॅनर्स, झेंड्यापैकी ७६३ बॅनर्स हे याच परिसरात होते.

### दारूच्या नशेत पुणे पोलिसांना फोनवर दिली धमकी

## प्लॅट फॉर्म वर बॉम्ब ठेवलाय, पुणे स्टेशन उडवणार



● पुणे, अभिजीत येरल्लू :

पुण्यातून खळबळजनक बातमी समोर आली आहे. पुणे रेल्वे स्टेशनवर बॉम्ब ठेवल्याच्या धमकीचा पोलिसांना फोन आला अन् एकच खळबळ उडाली. पुणे शहर पोलिसांना रेल्वे स्टेशनवर बॉम्ब ठेवल्याच्या धमकीचा फोन आला होता. त्यानंतर पोलिसांची यंत्रणा तात्काळ कामाला लागली. फोन करणाऱ्या व्यक्तीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

दारूच्या नशेत त्यानं फोन केल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी त्या व्यक्तीवर गुन्हा दाखल केलाय.पुणे रेल्वे स्टेशन वरील प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर बॉम्ब ठेवला असल्याचा पुणे शहर पोलीस नियंत्रण कक्षाला अज्ञात व्यक्तीकडून फोन आला. सकाळी ९ वाजता पुणे शहर पोलीस नियंत्रण कक्षात धमकीचा फोन आल्याचा समोर आले.

पान २ वर

## 'स्टेम प्रकल्पाच्या शहाड येथील नवीन पंप हाऊसचे काम दीड वर्षात पूर्ण करावे'

■ महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले निर्देश

■ स्टेम प्रकल्पात नवीन पंप हाऊस आणि जलवाहिनी अंथरण्याच्या कामाचा शुभारंभ

■ कामाचे स्वरूप -

■ १. ५०० दशलक्ष लिटर क्षमतेचे नवीन पंप हाऊस बांधणे

■ २. बारा किलोमीटर लांबीची जलवाहिनी अंथरणे



● ठाणे, रोहित जैसवाल :

ठाणे (०८) : ठाणे, भिवंडी-निजामपूर आणि मीरा-भाईंदर महापालिका क्षेत्रास पाणीपुरवठा करणाऱ्या स्टेम प्रकल्पात ५०० दशलक्ष लिटर क्षमतेचे नवीन पंप हाऊस आणि बारा किलोमीटरची नवीन जलवाहिनी यांच्या कामाचा शुभारंभ महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला. मूलभूत सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष तरतुदी अंतर्गत महापालिकांना राज्य शासनाकडून अनुदान मिळते. त्या अंतर्गत, ठाणे, भिवंडी-निजामपूर मीरा-भाईंदर महापालिका क्षेत्रास पाणीपुरवठा करणाऱ्या स्टेम प्रकल्पाची पाणी उचल क्षमता वाढवण्यासाठी, नवीन पंप हाऊसचे बांधकाम, नवीन जलवाहिनी टाकणे आणि जुन्या जलवाहिनीची दुरुस्ती करणे या कामासाठी २७८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.

पान २ वर

संपादकीय संपादक - राकेश शंकर गोरे

# जीडीपीचा नीचांक; महागाईचा उच्चांक

आज पुरेशी मागणी नाही आणि व्याजदरही जास्त असताना उद्योगपती कर्ज उभारणी मर्यादित करणार, हे स्पष्ट आहे. म्हणूनच अर्थगती वाढवण्याची जबाबदारी पुन्हा एकदा सरकारवरच येऊन पडली आहे! देशाचा आर्थिक विकासदर चालू आर्थिक वर्षाच्या जुलै ते सप्टेंबर यादरम्यान दोन वर्षांच्या नीचांकी पातळीपर्यंत, म्हणजे ५.४ टक्क्यांपर्यंत घसरला असून, याची केंद्र सरकाला दखल घ्यावीच लागेल. शहरी ग्राहकांची घटलेली मागणी आणि उत्पादन तसेच खाणकाम क्षेत्राच्या निराशाजनक कामगिरीमुळे अर्थव्यवस्थेची वाढ खुंटलेली दिसते. परंतु तरीही सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था, हे बिरूद देशाने कायम राखले आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील जुलै ते सप्टेंबर या तिमाहीत जीडीपी म्हणजे सकल देशांतर्गत उत्पादनातील वाढ ८.१ टक्के राहिली होती. तर एप्रिल ते जून २०२४ या पहिल्या तिमाहीत हा दर ६.८ टक्क्यांवर होता. तर शुक्रवारी जाहीर झालेल्या दुसर्या तिमाहीचा दर हा रिझर्व्ह बँकेच्या ७ टक्के अनुमानाच्या तुलनेत तब्बल दीड टक्क्याहून अधिक मंदावला आहे, ही नक्कीच काळजी करावी अशी बाब आहे. या आधी ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२ दरम्यान जीडीपी वाढीचा दर ४.३ टक्क्यांचा नीचांक नोंदवण्यात आला होता. राष्ट्रीय सांख्यिकी विभागाच्या आकडेवारीनुसार, कृषी क्षेत्राच्या वाढीचा वेग वर्षापूर्वीच्या १.७ टक्क्यांवरून सरलेल्या जुलै-सप्टेंबर तिमाहीत दुपटीने वाढून, 3.5 टक्क्यांवर पोहोचला आहे. परंतु उत्पादन क्षेत्राची कामगिरी सुमार राहिली असून, दुसर्या तिमाहीत विकासवेग २.२ टक्क्यांवर आक्रसला आहे. मागील वर्षांच्या याच कालावधीत तो १४.३ टक्क्यांवर गेला होता. म्हणजे उत्पादन क्षेत्राची संपूर्णपणे घसरगुंडी झालेली दिसते. शिवाय खाण आणि उत्खनन क्षेत्रातील कामगिरी गेल्या वर्षी सप्टेंबर तिमाहीअखेर ११.१ टक्के अशी दुहेरी अंकात राहिली होती. त्या तुलनेत ती यंदाच्या सप्टेंबर तिमाहीत जेमतेम ०.१ टक्क्यांवर आली आहे. शेती क्षेत्रातून जास्तीत जास्त लोकांना बाहेर काढून त्यांना उत्पादन क्षेत्रात स्थलांतरित करण्याचे धोरण आहे. कारण शेती आतबट्ट्याची असल्यामुळे त्यावर लोकांचे पोट भरत नाही. अर्थव्यवस्थेत समाधानकारक विकास होत आहे, तो सेवा क्षेत्राचा वित्त, गृहनिर्माण आणि व्यावसायिक सेवांच्या वाढीचा दर गेल्या तिमाहीत ६.७ टक्के राहिला, जो मागील वर्षीच्या ६.२ टक्के होता. त्याउलट वीज, गॅस, पाणीपुरवठा आणि इतर उपयुक्तता सेवांमध्ये ३.३ टक्क्यांची वाढ झाली आहे. ज्यात वर्षापूर्वीच्या १०.५ टक्क्यांच्या तुलनेत निम्म्याहून अधिक घट झाली आहे. वीज आणि पाणीपुरवठ्याचा वापर कमी झाला आहे. याचा अर्थ व्यवसाय उद्योगांची गती समाधानकारक नाही. बांधकाम क्षेत्राच्या वाढीचा वेगही निम्म्यावर आला आहे. खरिपाच्या उत्पादनात भरघोस वृद्धी झाली असून, रब्बी पिकांच्या हंगामाबद्दल आशा आहेत. अर्थातच यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था आणि मागणी यांच्यात सुधारणा अपेक्षित आहे. आता या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या चार महिन्यांत केंद्र सरकारने भांडवली खर्च वाढवल्यास, जीडीपीत आणखी वाढ होऊ शकेल. तसे झाले तरच संपूर्ण वर्षात ६.५ ते ६.७ टक्के हा विकासदर गाठता येईल. खरे तर जीडीपीची वाढ ५.४ टक्क्यांवर येणे, म्हणजेच मंदीचे प्रमाण अपेक्षेपेक्षा जास्त आहे, असे दिसते. केंद्र आणि राज्यांचा एकत्रित भांडवली खर्च पहिल्या सहा महिन्यांत अनुक्रमे १५ टक्के आणि ११ टक्क्यांनी घसरला आहे. हा खर्च कमी झाल्याचा परिणाम सर्वच क्षेत्रांवर झाला आहे. खासगी क्षेत्रातून गुंतवणूक आटली असताना निदान सरकारचा भांडवली खर्च लक्षणीयरीत्या वाढणे जरुरीचे होते. टक्के होता. प्रामुख्याने खाद्यवस्तूंच्या महागाईमुळे हा चलनफुगवटा झाला. या चलनवृद्धीमुळे नजीकच्या भविष्यातही व्याजदर कपात करणे रिझर्व्ह बँकेला शक्य नाही. किरकोळ महागाई दराची स्वीकारार्ह मर्यादा चार टक्के इतकी आहे. पण त्यापेक्षा दीड टक्के जास्त महागाई सध्या आहे. भाववाढ आटोक्यात न आल्यास, व्याजदर कपात होणार नाही आणि कमी व्याजात कर्जे मिळाली नाहीत, तर कारखानदार उत्पादन कसे काय वाढवू शकतील? महागाई प्रचंड असताना व्याजदर कपात केली, तर खर्च आणि उपभोग प्रवृत्तीस प्रोत्साहन मिळते. मागणी वाढल्यानंतर तिचा फायदा घेण्याकरिता भावही वाढवले जातात आणि त्यामुळे महागाई आणखी आकाशाला जाऊन भिडते. याउलट व्याजदर वाढवून कर्ज महाग केल्यास अर्थव्यवस्थेतील चलन तरलता कमी होते. देशातील उद्यमशीलता आणि मागणीस प्रोत्साहन मिळण्यासाठी कर्ज काही प्रमाणात स्वस्त होणे गरजेचे असते. परंतु चलनवृद्धीला लगाम घालणे शक्य होत नसल्यामुळे रिझर्व्ह बँक कात्रीत सापडली आहे. भाववाढ रोखण्याच्या धडपडीत विकासही कुंठित होण्याची भीती आहे. २०२३-२४ च्या तिसर्या तिमाहीत भारताने ८.४ टक्के इतकीच जीडीपी वाढ नोंदवली. परंतु सकल मूल्यवृद्धीचे (ग्रॉस व्हॅल्यू ॲडिशन) प्रमाण ६.५% इतकेच होते. आजही या परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही.गेल्या वर्षी विमानतळे, बंदरे, रस्ते, रेल्वे या क्षेत्रांवर मोठ्या प्रमाणात भांडवली खर्च करून, अर्थव्यवस्थेचा गाडा ओढण्याची जबाबदारी सरकारने पार पाडली. शिवाय लोकसभा निवडणूक व्हायची असल्यामुळे सरकार अधिक गतीने काम करत होते. खासगी क्षेत्र त्या प्रमाणात गुंतवणूक करत नसल्यामुळे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास हे सतत खासगी क्षेत्रास भांडवली गुंतवणूक वाढवण्याचे आवाहन करत होते.

# सत्र परीक्षा पद्धत नकोच !

**अध्यापनाचा कालावधी कमी करणारी, विद्यार्थी आणि प्राध्यापकांना सतत परीक्षा आणि मूल्यमापनाच्या चक्रात अडकवून ठेवणारी, संदर्भग्रंथ वाचण्यास प्रोत्साहन देण्याऐवजी केवळ आयत्या नोट्सवर भर देणारी सत्र परीक्षा पद्धत विद्यार्थ्यांतून परीक्षार्थी घडवत आहे आणि प्राध्यापकांना वेठीस धरत आहे.**



विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) २०१५ पासून 'चॉइस बेस्ड क्रेडिट सिस्टम' (सीबीसीएस) च्या अंमलबजावणीतून शैक्षणिक वर्षात, सत्र परीक्षा पद्धत (सेमिस्टर सिस्टिम) देशभरात सुरू केली. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२० नुसार यापुढे सत्र पद्धती सुरूच राहणार आहे. यात शैक्षणिक वर्षाचे दोन किंवा अधिक सत्रांमध्ये विभाजन केले जाते. ही पद्धत भारतात तसेच इतर देशांमध्ये उच्च शिक्षण संस्थांमध्ये राबविली जाते. आज या पद्धतीचा सर्वत्र स्वीकार केल्यानंतर सत्र परीक्षा पद्धतीने खरोखरच भारतातील उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारत आहे का, की उच्च शिक्षणाची त्यामुळे अधोगती होत आहे, याची सर्वांगाने समीक्षा करणे अत्यावश्यक आहे.

यूजीसीच्या १८ जुलै २०१८ च्या अधिसूचनेत सत्र पद्धतीत वर्षांच्या कालावधी नियोजनाचे दिशानिर्देश करण्यात आले आहे. यात सहा दिवसांचा आठवडा असलेल्या महाविद्यालयात प्रत्येक सत्रात शिकवण्यासाठी ९० दिवस (तीन महिने), प्रवेश परीक्षा आणि परीक्षेचे नियोजन यासाठी ३५ दिवस (पाच आठवडे), उन्हाळी आणि हिवाळी सुट्ट्यांसाठी प्रत्येकी पाच आठवडे, सरकारी सुट्ट्यांसाठी एक आठवडा अशी विभागणी करण्यात आली आहे. करण, वाणिज्य आणि विज्ञान या शाखांमधून भारतात बीए, एमए, बीकॉम, एमकॉम, बीएस्सी आणि एमएस्सी इत्यादी पदव्या दिल्या जातात. पारंपारिक पदवी अभ्यासक्रमांचा विचार करता, भारतीय समाज, भौगोलिक स्थिती, सामाजिक विविधता आणि लोकसंख्या यामुळे प्रत्यक्ष जमिनीवर 'सत्र परीक्षा पद्धती' पूर्णपणे अपयशी ठरल्याचे दिसते.

सत्र परीक्षा पद्धतीमुळे महाविद्यालयांत शिकवणे कमी आणि परीक्षाच जास्त अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. यूजीसीच्या २०१८ च्या पत्रानुसार प्रत्येक सत्रात ९० दिवस (साधारणपणे तीन महिने) शिकवणे झालेच पाहिजे, असा अट्टहास आहे. ९० दिवसांचा कालावधी एक विषय शिकवण्यासाठी पुरेसा आहे का, हा चिंतनाचा आणि संशोधनाचा विषय आहे. तीन महिन्यांचा कालावधी विषयाच्या आकलनासाठी परिपूर्ण नसला तरी हा कालावधीदेखील नावालाच आहे. प्रत्येक सत्रात प्रत्यक्षात महाविद्यालय पातळीवर शिकण्या आणि शिकवण्यासाठी ९० दिवसांपेक्षा कमी कालावधी मिळतो.

कारण राज्यातील महाविद्यालये विद्यापीठांशी संलग्न आहेत. विद्यापीठांमध्ये पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमात शिकवले जाणारे हजारो विषयांच्या परीक्षा आणि मूल्यमापन हे यूजीसीच्या दिलेल्या ३५ दिवसांच्या कालावधीत बसवणे कुठल्याही विद्यापीठाला निव्वळ अशक्य आहे. यात सीबीसीएस आणि पुनः परीक्षा किंवा रिपीटर विद्यार्थ्यांच्या परीक्षांचा विचार केल्यास परीक्षा कालावधी वाढतच जातो. हा कालावधी सत्राला ७५ ते ९० दिवसांपर्यंत (अडीच ते तीन महिन्यांपर्यंत) लांबत जातो. म्हणजेच एका वर्षाचा विचार केल्यास परीक्षा आणि मूल्यांकन यात सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी खर्च होतो. याचा परिपाक म्हणून शिकवण्यासाठी दिलेला तीन महिन्यांचा कालावधी आकुंचित होऊन दोन महिनेच शिल्लक राहतात. तत्त्वतः आधीच विषय शिकवण्यासाठी मिळालेला कमी कालावधी आणखी कमी होतो.

परीक्षेच्या कालावधीत महाविद्यालयातील अनेक वर्गखोल्या अडकून असतात. प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी परीक्षा प्रक्रियेमध्ये व्यग्र असतात. या काळात प्राध्यापक शिकवण्यासाठी उपलब्ध होत नाही. नियमित आणि नापास झालेले विद्यार्थी लांबलेल्या परीक्षेमध्ये गुंतलेले असतात. ते शिकण्यासाठी वर्गामध्ये हजर नसतात. परिणामी परीक्षा संपेपर्यंत महाविद्यालयात शिकणे आणि शिकवण्याची महत्त्वाची प्रक्रिया थांबून राहते.

विद्यापीठाने संलग्न महिविद्यालायांच्या परीक्षांसाठी बसवलेले विस्तृत वेळापत्रक अर्ध्यावर आल्यावर दुसरे महत्त्वाचे काम सुरू होते, ते म्हणजे विद्यार्थ्यांच्या "उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन परीक्षा झाल्यानंतर उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करणे आणि निकाल लावणे ही महत्त्वाची प्रक्रिया आहे. हजारो विषयांच्या परीक्षा घेऊन लाखो उत्तरपत्रिका तपासून वेळेत निकाल लावणे मिळालेल्या कालावधीत अशक्य आहे. यामुळे परीक्षेचा कालावधी वाढतो आणि अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी दिलेला कालावधी आणखी कमी होतो.

अनेक वर्षांपासून रखडलेल्या कर्मचारी भरतीमुळे मनुष्यबळाचा तुटवडा असलेली विद्यापीठे सत्र पद्धतीने अधिक अडचणीत सापडली आहेत. परीक्षा घेणे, उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करणे, निकाल लावणे हेच आता राज्यातील विद्यापीठांचे प्रमुख काम झाले आहे.

विषयांची संख्या दुप्पट झाल्याने त्यांचे अभ्यासक्रम तयार करणे एक मोठे संकट आणि वेळखाऊ काम झाले आहे. सततच्या परीक्षा, निकाल आणि मूल्यांकनात होणाऱ्या मानवी चुकांचे प्रमाण वाढलेले असून, त्यात भरडल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय आहे.

अंतर्गत आणि बहिर्गत अशा चार परीक्षा, मूल्यांकन आणि अभ्यासक्रम तयार करणे यामुळे विद्यापीठांचा खर्च वाढला आहे. या वाढलेल्या खर्चाचा भार सरकारी अनुदाने कमी किंबहुना बंद झाल्याने शेवटी विद्यार्थावरच टाकला जातो. विद्यापीठांचा खर्चाचा डोलारा सांभाळण्यासाठी प्रशानसनाला प्रवेश आणि परीक्षा इत्यादींचे शुल्क वाढवावे लागते. वर्षातून दोनदा परीक्षा होत असल्याने विद्यार्थ्यांना दोनदा परीक्षा फी भरावी लागते. खर्च वाढून विद्यार्थी शिक्षणापासून दूर जात आहे. ही स्थिती महाराष्ट्रातील जवळपास सर्व विद्यापीठांमध्ये आहे. काही विद्यापीठे विविध दंड स्वरूपात विद्यार्थांकडून 'वसुली' करून होणाऱ्या खर्चाचा ताळमेळ बसवण्यात तरबेज झाली आहेत. सरकारे आणि विद्यापीठांची शिक्षणातदेखील नफा आणि तोटा पाहण्याची वृत्ती कल्याणकारी राज्याला अशोभनीय आहे.

पद्धतीमुळे विद्यार्थी फक्त परीक्षार्थी झाला आहे. महाविद्यालय आणि विद्यापीठ पातळीवर वर्षातून दोनदा अंतर्गत आणि सत्र परीक्षा घेतल्या जातात. विद्यार्थ्यांची ऊर्जा विषयाच्या आकलनापेक्षा परीक्षा देण्यावरच जास्त खर्च होते. वास्तविक आकलनासाठी जास्त आणि मूल्यांकनासाठी कमी वेळ व ऊर्जा खर्च झाली पाहिजे. हे मूलभूत तत्त्व आपण विसरत आहोत.

संदर्भग्रंथ हद्दपार होऊन त्यांची जागा विविध प्रकाशकांच्या ३०- ४० पानी टेक्स्ट बुक्स आणि नोट्स' यांनी घेतली आहे. ही साधने विद्यार्थ्यांची बौद्धिक भूक भागविण्यासाठी पुरेशी नाहीत. अशा साधनांच्या माध्यमातून अभ्यास करणारे विद्यार्थी हे आयुष्यभरासाठी बौद्धिकदृष्ट्या कुपोषित राहतात. ते स्वअध्ययनाच्या पातळीवर पोहोचत नाहीत.

सत्र पद्धतीत विषय संख्येने जास्त आहेत, तरी वार्षिक परीक्षा पद्धतीच्या तुलनेत अभ्यासक्रम कमी झाला आहे. वार्षिक पद्धतीत शिकवली जाणारी साधारणतः नऊ प्रकरणे आता तीनवर आली आहेत. वेळेअभावी अभ्यास मंडळे तीन प्रकरणांची ओढून चार प्रकरणे करतात. इतक्या मर्यादित अभ्यासक्रमात अंतर्गत परीक्षा आणि सत्र परीक्षांसाठी पुनरावृत्ती टाळून प्रश्नपत्रिका तयार करणे कठीण होऊन बसते.

सध्याच्या 'रोल'च्या काळात आधीच अस्थिर झालेला विद्यार्थी सत्र परीक्षा पद्धतीत अधिकच अस्थिर होत आहे. सततच्या परीक्षांमुळे त्याची ज्ञान ग्रहण करण्याची आणि आकलनक्षमता लोप पावत आहे. व्यक्तिमत्त्व विकासाचे अनेक उपक्रम मागे पडत आहेत. अशा उपक्रमांना विद्यार्थी मिळेनासे झाले आहेत.

वार्षिक परीक्षा पद्धती अधिक योग्य होती, असा सूर विद्यापीठांतील शिक्षकवर्गात उमटू लागला आहे. त्या पद्धतीत संख्येने कमी विषय अधिक विस्तृतपणे शिकवले जात. विद्यार्थी संदर्भग्रंथांचे वाचन करून विषयाचे सखोल ज्ञान संपादन करत. आकलनक्षमता वाढल्यावर 'शिक्षकाशिवाय विषय अभ्यासण्यास विद्यार्थी मोकळा असे.

परीक्षा आणि उत्तरपत्रिका मूल्यांकनाचा लांबलेला कालावधी एकीकडे विद्यार्थांच्या शैक्षणिक कालखंडाचा आणि दुसरीकडे प्राध्यापकांना मिळणाऱ्या सुट्ट्यांचा बळी घेतो. महाविद्यालयीन प्राध्यापकांना कुठल्याही हक्क रजा मिळत नाहीत. दूरवर राहत असलेल्या कुटुंबाच्या भेटीसाठी उन्हाळी आणि हिवाळी सुट्ट्या महत्त्वाच्या असतात. दूर अंतरावरील आणि जिह्यातील शिक्षकांना कुटुंबाच्या भेटीसाठी मोठी कसरत करावी लागते. त्यामुळे अनेक विद्यापीठांतील प्राध्यापक वेळोवेळी आंदोलन करतात.

प्राध्यापकांच्या अनेक जागा रिक्त आहेत. वारंवार अंतर्गत आणि विद्यापीठीय परीक्षा घेणे, उत्तरपत्रिका तपासणे आणि निकाल जाहीर करणे यामुळे व्यवस्थेवर मोठा ताण येतो. अभ्यासक्रम कर्मकांड केल्याप्रमाणे जलदगतीने उरकावा गतो. परिणामी शिक्षणातील गुणवत्ता कमी होते. प्राध्यापकवर्गदेखील संदर्भग्रंथांपासून दूर जाऊ लागला आहे. महाग उच्च शिक्षणामुळे मोठ्या संख्येने गरीब विद्यार्थी उच्च शिक्षणाच्या परिघाबाहेर फेकले जात आहेत. साधारण आकलनक्षमता आणि शिकण्याचा स्वतःचाच एक वेग असणाऱ्या विद्यार्थ्यांना या पद्धतीत पूर्वीप्रमाणे सामावून घेतले जात नाही. या सर्व बाबी नवीन शिक्षण धोरणातील उच्च शिक्षणातील समता आणि समावेशकता या तत्त्वाला हरताळ फासणाऱ्या आहेत.

विद्यार्थ्यांतून 'प्रॉडक्ट' बनविण्याचा केविलवाणा आणि अयशस्वी प्रयत्न सरकारद्वारे केला जात आहे. नवीन शैक्षणिक धोरणात तातडीने या पद्धतीचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे. सरकारने विद्यार्थी, प्राध्यापक आणि विद्यापीठे या घटकांशी विस्तृत चर्चा करून यातून मार्ग काढला पाहिजे. जेणेकरून शिक्षणासाठीच्या खर्चाचा बोजा कमी होईल. राज्यात बौद्धिकदृष्ट्या सुदृढ विद्यार्थी आणि नागरिक निर्माण करण्यासाठी हे अत्यावश्यक आहे.

## पान १ वरून...

पान १ वरून...

### 'स्टेम प्रकल्पाच्या शहाड येथील...

तत्कालीन मुख्यमंत्री आणि आताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या निधीस ऑक्टोबर २०२४मध्ये मान्यता दिली. तांत्रिक मान्यता होऊन सुमारे तीन वर्षे प्रलंबित राहिलेल्या या प्रकल्पासाठी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी पाठपुरावा केला.

स्टेम अंतर्गत येणाऱ्या महापालिका क्षेत्राची वाढीव पाण्याची आवश्यकता लक्षात घेऊन नवीन पंप हाऊस आणि नवीन जलवाहिनी यांचे काम पूर्ण करण्यासाठी दोन वर्षांचा अवधी देण्यात आला असला तरी ते काम दीड वर्षातच पूर्ण करावे. त्यामुळे या परिसराला कोणत्याही अडथळ्याशिवाय पाणीपुरवठा करणे शक्य होईल. तसेच, भविष्यात वाढीव पाणी उपलब्ध झाल्यास तेही या यंत्रणेमार्फत पुरवणे शक्य होईल, असे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी याप्रसंगी स्पष्ट केले. या शुभारंभ प्रसंगी, ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, स्टेमचे व्यवस्थापकीय संचालक संकेत घरत आदी मान्यवर उपस्थित होते.

**क्षमता वृध्दी आणि वीज बचत**

नवीन पंप हाऊसमुळे पाणी उचलण्याची क्षमता तर वाढेलच. शिवाय नवीन जलवाहिनी अंथरल्यामुळे पाण्याची गळती तसेच घट कमी होईल. तसेच, सध्या नऊ पंप चालवून पाणी उचलावे लागते. नवीन व्यवस्थेत सहा पंप चालवावे लागतील. त्यामुळे विजेची मोठ्या प्रमाणात बचत होईल, असा विश्वास व्यवस्थापकीय संचालक संकेत घरत यांनी व्यक्त केला.

स्टेम कंपनीकडून सध्या ३०० दशलक्ष लीटर पाणी पुरवठा करण्यात येतो. या पाण्याचे ठाणे महापालिका भिवंडी निजामपूर महापालिका आणि मीरा-भाईंदर महापालिका तसेच जिल्हा परिषद क्षेत्रातील काही गावे यांना वितरण करण्यात येते. उल्हास नदीपात्रातून पाणी उचलण्यासाठी ३०० दशलक्ष लिटर क्षमतेचे पंप हाऊस आणि जलवाहिनी यांचे बांधकाम १९८५मध्ये करण्यात आले. कालमानाप्रमाणे हे पंप हाऊस जुने झाले असून जलवाहिन्याही जुन्या झाल्या आहेत त्यामुळे पाणीपुरवठा करण्यात अडथळे निर्माण होतात. त्यावर मात करण्यासाठी नवीन आणि जास्त क्षमतेचे पंप हाऊस तसेच जलवाहिन्यांचे काम हाती घेण्यात आले आहे.

**कामाचे स्वरूप**

१. शहाड येथे उल्हास नदीच्या पात्राशेजारी ५०० दशलक्ष लिटर क्षमतेचे नवीन पंप हाऊस बांधणे.

२. शहाड ते टेमघर अशी ०९ किलोमीटर अंतराची अशुद्ध पाणी वाहून देणारी जलवाहिनी अंथरणे.

३. टेमघर ते माणकोली मुख्य वितरण टाकी अशी ०३ किलोमीटरची शुद्ध पाण्याची जलवाहिनी अंथरणे.

### राज ठाकरेंची हवा गेली,...

नवीन सरकारकडून विकासाच्या मागण्या केल्याचही ते म्हणाले.

विरोधकांनी रडीचा डाव खेळू नका त्यांनी लोकशाहीचा अपमान करू नये. लोकसभेला ईव्हीएम खराब आहेत असं आम्ही म्हणालो का? असा सवाल त्यांनी मविआवर टीका करताना केला. त्यांनी पराभव मान्य केले पाहिजे. ईव्हीएम मशीन हे तुम्हीच आणली पुन्हा पेपरवर निवडणुका घेणे निवडणूक आयोग ठरवेल. बॅलेट पेपरवर आम्हला जास्त मतदान मिळेल, असेही ते म्हणाले.

### प्लॅट फॉर्म वर बॉम्ब ठेवलाय, पुणे...

पोलिसांनी घटनेचं गांभीर्य ओळखून तात्काळ तपास करत त्याला ताब्यात घेतलेय. फोन करणार व्यक्ती वय ४० पिंपरी - चिंचवड भागातील रावेत येथील राहणारा असल्याची माहिती.

या व्यक्तीला पिंपरी चिंचवड पोलिसांनी ताब्यात घेतले असून, सदरील व्यक्तीने दारूच्या नशेत खोडसाळपणे फोन केल्याचं तपासात उघड झालेय. आपल्याकडे लोकाचे लक्ष वेधून घेण्यासाठी कॉल केल्याचं पोलिसांच्या तपासात त्या व्यक्तीने सांगितले. पिंपरी - चिंचवड पोलिसांकडून सदरील व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलाय. अधिक तपास पिंपरी चिंचवड पोलीस करत आहेत.

पुणे रेल्वे स्टेशनवर बॉम्ब असल्याची धमकी देणाऱ्या व्यक्तीचे नाव सागर भंडारी असे आहे. रावेत येथील किवळे गावठाण येथे तो राहतो. रावेत पोलिसांनी त्याला तात्काळ ताब्यात घेतले. त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दारू पिल्यानंतर सागर यानं पोलिसांना फोन करून धमकी दिली होती.

### भाजप शिंदेसेनेला गृहखातं देणार...

महायुतीत ३० ते ३५ मंत्री असलेले मोठे मंत्रिमंडळ अपेक्षित आहे. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाची सर्वाधिक संख्या ४३ आहे. यामध्ये मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचाही समावेश आहे.

मंत्रिमंडळात फारसे फेरबदल होणार नाहीत

नाव न सांगण्याच्या अटीवरून एका भाजपा नेत्याने इंडियन एक्स्प्रेसला सांगितले , "तीन पक्षांची युती राज्यात अडीच वर्षांपासून राज्य करत आहे. शिंदे ते फडणवीस मुख्यमंत्री बदल सोडला तर इतर बहुतांश फेरबदल किरकोळ असतील. मंत्रिमंडळाची रचना तशीच राहण्याची शक्यता आहे, प्रत्येक पक्षाने त्यांचे विद्यमान पोर्टफोलिओ मुख्यत्वे राखून ठेवले आहेत मात्र, काही विभागांबाबत काही वाटाघाटी होऊ शकतात. घराव्यतिरिक्त ऊर्जा, जलसंपदा, आदिवासी कल्याण, गृहनिर्माण, ग्रामीण विकास, ओबीसी कल्याण आणि उच्च आणि तांत्रिक शिक्षण विभाग राखण्याचे भाजपचे उद्दिष्ट आहे.

यापूर्वीच्या सरकारमध्ये महसूल आणि सार्वजनिक बांधकाम विभागही भाजपाकडे होते. शिवसेनेने नगरविकास कायम ठेवल्यास महसूल/सार्वजनिक बांधकाम खाते भाजपाकडे परत येईल. मात्र, शिवसेनेला उद्योग, शालेय शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा आणि स्वच्छता, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), अल्पसंख्याकांचा विकास आणि वक्फ बोर्ड विकास, मराठी भाषा या ही खाती देण्यात येण्याची शक्यता आहे.

राष्ट्रवादीला कोणती खाती मिळणार?

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला अर्थ, सहकार, कृषी, आरोग्य आणि उच्च शिक्षण, तसेच अन्न व औषध प्रशासन आणि महिला व बालकल्याण ही प्रमुख मंत्रालये मिळण्याची शक्यता आहे.

### अजित पवारांना डबल दिलासा,...

भाजपबरोबर गेल्यानेच अजित पवार यांना हजार कोटींची मालमत्ता पुन्हा मिळाली असल्याचा आरोप या प्रकरणाचा पाठपुरावा करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. पहाटेच्या शपथविधीनंतर सुमारे ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्यात अजित पवारांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलासा दिला होता. ५ डिसेंबर रोजी अजितदादांनी पुन्हा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्याच दिवशी दिल्लीतील लवादाने अजित पवारांशी संबंधितांच्या मालमत्तेवर आणलेली टाच उठविण्यात आली आहे. यापूर्वी केंद्रीय यंत्रणांनी राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांचीही जप्त केलेली मालमत्ता परत केली होती.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www. lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# सिध्देश्वर तलाव परिसरात साफसफाई स्वच्छतेविषयी जनजागृतीवर भर

**ठाणे (रोहित जैसवाल) :** ठाणे महापालिकेतर्फे शनिवारी सकाळी उथळसर प्रभाग समितीतील सिद्धेश्वर तलाव परिसरात सर्वंकष स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या सर्वंकष स्वच्छता मोहिमेत मोठे रस्ते आणि चौक यांची स्वच्छता सुरू करण्यात आली होती. त्यातच आता झोपडपट्टी परिसर, अंतर्गत रस्ते यांचीही स्वच्छता करण्यात येत आहे.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार झोपडपट्टी परिसरातील अंतर्गत रस्ते, गटारे, सार्वजनिक शौचालय यांच्या स्वच्छतेची मोहीम शनिवारी उथळसर प्रभाग समितीतील सिद्धेश्वर तलाव परिसरात राबवण्यात आली. अतिक्रमण



विभागानेही रस्त्यावरील अतिक्रमणे हटवून परिसर मोकळा केला. घनकचरा व्यवस्थापन विभाग, अतिक्रमण विभाग आणि उपसर प्रभाग समिती यांच्या समन्वयाने या परिसरातील गटारी अंतर्गत रस्ते सार्वजनिक शौचालय यांची सर्वांक स्वच्छता करण्यात आली. या अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्या मार्गदर्शनात, या स्वच्छता मोहिमेत सुमारे १०० स्वच्छता कर्मचाऱ्यांसोबत उपायुक्त मनीष जोशी आणि आरोग्य अधिकारी डॉक्टर राणी शिंदे यांनीही सहभाग घेतला.

सर्वकष स्वच्छता मोहिमेत झोपडपट्टी परिसरातील अंतर्गत रस्ते, गटारे, आणि सार्वजनिक शौचालय यांची स्वच्छता करण्यास सुरुवात झाली आहे. त्यातून स्वच्छतेविषयी नागरिकांमध्ये जागरूकता वाढेल आणि शहर अधिक स्वच्छ व आरोग्यदायी होईल, असा विश्वास उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) मनीष जोशी यांनी व्यक्त केला आहे.

# सिटी कल्याण निसर्गमेळाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**कल्याण (विवेक गुंजाळ) :** पर्यावरण दक्षता मंडळ, कल्याण, रोटरी क्लब ऑफ कल्याण सिटि आणि नॅशनल उर्दू हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने "सिटी कल्याण निसर्गमेळा २०२४" चे आयोजन करण्यात आले होते. या मध्ये विविध शाळेतील ७वी आणि ८वी च्या विद्यार्थ्यांसाठी एकूण ८ वेगवेगळ्या प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमागचे मुख्य उद्दिष्ट पर्यावरण शिक्षण देणे व त्याच बरोबर जनजागृती घडवणे हा होता. ३ डिसेंबर भोपाळ वायु दुर्घटना या दिवसाची स्मृति प्रीत्यर्थ या उपक्रमात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्ड यांच्या सहकार्याने हवा प्रदूषण तपासणीची मोबाइल व्हॅन उपस्थित विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली. तसेच जागतिक मृदा दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी मातीपासून विविध आकाराचे भांडे बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

या निसर्गमेळ्यामध्ये झाडे ओळखा स्पर्धा, निसर्ग छायाचित्रण स्पर्धा, भित्तिचित्र स्पर्धा, इंधन विरहित पाककृती, कापडी पिशवीवर चित्र काढणे, टाकाऊ पासून टिकवू, पर्यावरण गीत आणि पथनाट्य अशा एकूण ८ स्पर्धांचा समावेश होता. सर्व स्पर्धांसाठी तज्ञ व मान्यवर परिक्षकांचे सहकार्य लाभले. कल्याण डोंबिवली परिसरातील १४ तज्ञ मंडळींनी या कार्यात मोलाचे सहकार्य केले. रोटरी क्लब ऑफ कल्याण सिटि तर्फे सर्व विजेत्या स्पर्धकांना पुरस्कृत करण्यात आले तसेच सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. पर्यावरण दक्षता मंडळातर्फे पर्यावरण प्रदर्शनी आणि पक्षी छायाचित्रांचे प्रदर्शन सादर करण्यात आली.

सुभेदार वाडा शाळा, शारदा मंदिर शाळा, शिशुविकास बेतूरकर पाडा, आंबेडकर रोड, श्री गजानन विद्यालय प्राथमिक आणि माध्यमिक, के. सी. गांधी शाळा, बालक मंदिर इंग्लिश, श्री वाणी विद्याशाळा, गायत्री माध्यमिक शाळा, नूतन ज्ञान मंदिर, आश्रय फौंडेशन काळसेकर हायस्कूल, ओल्ड बॉइज असो. इंग्लिश शाळा, मोहमदीया शाळा, नरेंद्र कान्वेंट स्कूल, स. ब. दिव्य शाळा, अभिनव विद्यालय, नॅशनल उर्दू हायस्कूल इतर एकूण २० शाळांमधून एकूण ३५० विद्यार्थी सहभागी झाले होते. पर्यावरण दक्षता मंडळातर्फे समीक्षा चव्हाण, हेमांगी सामंत, आदित्य कदम आणि रूपाली शाईवाले यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले.

# केडीएमसी करणार महाराष्ट्र राज्याच्या तृतीयपंथीयांच्या धोरणाची अंमलबजावणी

**कल्याण (आकाश कांबळे) :** किन्नर समुदाय हा समाजातील एक दुर्लक्षित, उपेक्षित समाज आहे, या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याच्या कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ इंदु राणी जाखड यांच्या निर्देशानुसार महापालिकेच्या समाज विकास विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांनी आज अस्मिता किन्नर संस्थेच्या कल्याण पूर्व येथील कार्यालयास समक्ष भेट देऊन तेथील किन्नर पंथीयांशी संवाद साधला. त्यांच्याशी चर्चा करत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि समाजातील या दुर्लक्षित घटकास मुख्य प्रवाहात आणून मानसन्मानाने जगण्यासाठी काय उपाययोजना करता येतील याबाबत किन्नर पंथाच्या गुरू नीता केणे यांचेशी सविस्तर चर्चा केली. किन्नर पंथीयाची प्रथम महापालिकेकडे नोंदणी करून त्यांचे मनोगत, त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी त्यांच्यासाठी प्रथमतः महापालिकेच्या नाट्यगृहात किन्नर महोत्सव आयोजित केला जाईल. किन्नर पंथीयांचे बचत गट तयार करून त्यांना व्यवसायभिमुख



प्रशिक्षण देऊन उदर निर्वाहासाठी मार्केट उपलब्ध करून त्यांच्या उपजीविकेसाठी महापालिकेमार्फत सहकार्य केले जाईल असे आश्वासन उपायुक्त संजय जाधव यांनी यावेळी तेथे उपस्थित असलेल्या किन्नर पंथीयांना दिले. किन्नर समुदायाने महापालिकेच्या उपक्रमांमध्ये सहकार्य करण्याचे आश्वासन देऊन महापालिका करीत असलेल्या सहकार्याबाबत समाधान व्यक्त केले आणि महापालिका आयुक्त स्वतः डॉक्टर असल्यामुळे त्यांनी त्यांच्याशी हितगुज करण्यासाठी वेळ मागितली आहे. आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून लवकरच किन्नर संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्यात येणार आहे.

# टिटवाळा ते शिळफाटा बाह्यवळण रस्त्यात अडथळा ठरणारी १२५ बांधकामे जमीनदोस्त

**दिवा (सम्यक कासारे) :** टिटवाळा-कल्याण-डोंबि वली ते शिळफाटा दरम्यानच्या ३० किलोमीटर लांबीच्या बाह्यवळण रस्ते मार्गात अडथळा ठरणारी १२५ बांधकामे कल्याण डोंबिवली पालिकेच्या अ प्रभागाच्या अतिक्रमण नियंत्रण पथकाने शुक्रवारी जमीनदोस्त केली. या कारवाईमुळे मागील काही वर्षापासून अटाळी भागात रखडलेला बाह्यवळण रस्ते मार्गाचा टप्पा बांधणीचा मार्ग मोकळा झाला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे कल्याण डोंबिवली पालिका हद्दीत टिटवाळा-आंबिवली अटाळी-गांधारे पूल-वाडेघर ते दुर्गाडी किल्ला-पत्रीपूल ते मोठागाव-कोपर-भोपर ते शिळफाटा-



काटई-हेदुटणे असा ३० किलोमीटर लांबीचा कल्याण व डोंबिवली शहराबाहेरून जाणारा बाह्यवळण रस्ता उभारणीचे काम सुरू आहे. या रस्त्यामधील टिटवाळा ते वाडेघरपर्यंतचे रस्ते बांधणीचे टप्पे पूर्ण झाले आहेत. या टप्प्यामधील अटाळी भागात वळण रस्त्याच्या मार्गात १२५ चाळ, झोपड्यांची बांधकामे होती. या रहिवाशांच्या पुनर्वसनाचा प्रश्न काही वर्षापासून रखडला होता. हा प्रश्न आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या पुढाकाराने मार्गी लागला. त्यामुळे आयुक्त डॉ. जाखड यांच्या आदेशावरून अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, अतिक्रमण नियंत्रण उपायुक्त अवधूत तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संदीप रोकडे यांनी अतिक्रमण नियंत्रण, फेरीवाला हटाव पथक, जेसीबी आणि पोलीस कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत शुक्रवारी दिवसभरात अटाळी भागातील वळण रस्ते कामाला अडथळा ठरणारी १२५ बांधकामे जमीनदोस्त केली.





**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या दिवा प्रभाग समितीच्या अतिक्रमण विभागाकडून दिवा स्टेशन परिसरातील फेरीवाले व हातगाड्यावर कारवाई करण्यात आली. तर काही हातगाड्या जागेवर तोडण्यात आल्या.

# निवडणुकीत सहकार्य करणाऱ्यांचा खडकपाडा पोलिसांनी केला सन्मान

**कल्याण (गणेश बागडे) :** नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीमध्ये बंदोबस्त कामी मनुष्यबळ अपुरे पडत असल्याने हि उणीव लक्षात घेऊन परिमंडल ३ चे पोलिस उपायुक्त अतुल झेंडे यांनी परिमंडळ तीन मधील सर्व पोलीस स्टेशनला कॉलेजचे एनसीसी व एनएसएसचे विद्यार्थी यांची विशेष पोलीस अधिकारी म्हणून मदत घेण्याबाबत सुचविले होते.

त्याप्रमाणे खडकपाडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ अमरनाथ वाघमोडे यांनी के. एम. अग्रवाल कॉलेज गांधारी व एल. डी. सोनवणे कॉलेज वाडेघर कल्याण यांच्याशी संपर्क साधून त्यांना निवडणूक बंदोबस कामी एनसीसी, एनएसएस विद्यार्थी मदतीस देण्यासाठी आवाहन केले. त्याप्रमाणे अग्रवाल कॉलेजचे एनसीसी २५ विद्यार्थी व सोनवणे कॉलेजचे एनएसएसचे २५ विद्यार्थी उपलब्ध झाले होते. या विद्यार्थ्यांनी मतदान केंद्रावर पोलिसांच्या सूचनेप्रमाणे नागरिकांच्या रांगा लावणे, ज्येष्ठ नागरिकांना मदत करणे असे महत्त्वाची कामे केल्याने पोलीस विभागांना त्यांची फार मोठी मदत झाली. याची जाणीव ठेवून पोलीस उपयुक्त परिमंडळ 3



कल्याण यांनी अशा सर्व विशेष पोलीस अधिकारी यांचा व निवडणूक काळात मदत करणारे इतर पोलीस मित्र यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्याचे आदेश दिले होते.

खडकपाडा पोलीस स्टेशन येथे या सर्व एनसीसीचे व एनएसएसचे विद्यार्थी आणि पोलीस मित्र यांचा विशेश पोलीस अधिकारी म्हणून त्याचप्रमाणे निवडणूक काळामध्ये बाहेर गावाहून बंदोबस्त करिता आलेले पोलीस, होमगार्ड यांची राहण्याची व्यवस्था करणारे ब्रायटन वर्ल्ड स्कूलचे संचालक पंकज वीर, वाहने पुरविणारे दुर्गा टूर्स ट्रॅव्हल्सचे विश्वंभर डोमाडे, जेवण पुरविणारे लक्ष्मी केटरर्सचे संध्या सोनार, ड्रोन ऑपरेटर अद्वैत ढाकणे, सर्व पोलिस वाहनावर पी ए सिस्टीम पुरविणारे प्रमोद गावडे बंदोबस्ताचे लोकांकरिता कार्पेट व इतर व्यवस्था पुरविणारे अरुण चव्हाण यांचा देखील विशेष सन्मान यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांच्या हस्ते करण्यात आला.

त्याचप्रमाणे डॉ अमरनाथ वाघमोडे, पोलीस निरीक्षक संदीप शिवले, महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक अंबिका घस्ते यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र आणि गुलाब पुष्प देऊन करण्यात आला. पोलिसांनी आपल्या कामाची घेतलेली दखल व केलेला सन्मान यामुळे सर्व विद्यार्थी व पोलीस मित्र आनंदी झाले असल्याचे दिसून आले. यावेळी विद्यार्थ्यांनी व पोलीस मित्र यांनी पोलीस बंदोबस्त दरम्यान आपल्याला आलेले अनुभव कथन केले. पोलिसांबरोबर काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल तसेच केलेल्या सन्मानाबद्दल आभार व्यक्त केले.

# उरणच्या बाजारात वालाच्या शेंगा, वीकेंडला रुचकर पोपटीचे बेत

**उरण (भावना जैन) :** सध्या बाजारात हंगामातील पहिले वालाचे पीक दाखल झाले आहे. त्यामुळे उरणच्या ग्रामीण भागात प्रसिद्ध असलेल्या रुचकर, मसालेदार पोपटीचे आकर्षण वाढू लागले आहे. वीकेंडला सध्या उपलब्ध असलेल्या वालाच्या शेंगाची पोपटी करण्याचे बेत ठरू लागले आहेत. दिवाळी संपली की मग चाहूल लागते ती थंडीची. हळूहळू हवेत गारवा निर्माण होऊ लागतो. दिवाळीच्या वेळेत भाताची कापणी झाली की लगेचच वाल, मटार, चवळी आदि कडधान्ये,पालेभाज्या शेतात पेरले जातात. ती पूर्ण बहरली की मग त्याची कापणी केली जाते अशा थंडीच्या मोसमात मित्रमैत्रिणींसोबत चटकदार पोपटीवर ताव मारण्याची मजा काही औरच असते. कोकणातील प्रसिद्ध परंपरा म्हणून किंवा जीवनशैलीचा एक भाग म्हणून पोपटीचे आयोजन केले जाते. त्यातही रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागात थंडीच्या दिवसात सर्वत्र पोपटीचे बेत रंगतात. जुन्या लोकांच्या मते पोपटी सर्वप्रथम अलिबागमध्ये करण्यात येऊ लागली. नंतर हळूहळू त्याचे लोण सर्वत्र पसरले. आजही जिल्ह्याचे महत्वाचे ठिकाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या



अलिबागचे शहरीकरण होत असले तरी ग्रामीण खाद्यसंस्कृतीचा भाग असलेली पोपटीचे आजही मोठ्या प्रमाणात सर्वत्र आयोजन केले जाते. उरण आणि रायगड परिसरातील वालाच्या पोपटाची चव ही अमेरिका, इंग्लंडसारख्या देशांतही पोहचली आहे. येथील परदेशी पाहुणे चिरनेर परिसरात या पोपटीचा आस्वाद घेण्यासाठी येत आहेत. वालाचे पीक हे दोन प्रकारे घेतले जाते. एकतर भात कापणीनंतर वाल लावले जातात. पाण्यावरील वाल आणि दवावरील वाल असे दोन प्रकार आहेत. यातील थंडीत दवावर पिकविण्यात येणारे वाल जानेवारी अखेरपर्यंत बाजारात येणार असल्याची माहिती चिरनेर मधील शेतकरी प्रफुल्ल खारपाटील यांनी दिली.

# शिवसेनेचे रघुनाथ मोरे यांचे निधन



**ठाणे (यश सावंत) :** शिवसेनेचे माजी ठाणे जिल्हाप्रमुख रघुनाथ मोरे (७६) यांचे शनिवारी निधन झाले. शिवसेनेचे दिवंगत ठाणे जिल्हा प्रमुख आनंद दिघे यांचे अत्यंत जवळचे सहकारी म्हणून मोरे यांची ओळख होती. आनंद दिघे यांच्या निधनानंतर त्यांनी जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी साभांळली होती. शिवसेनेच्या प्रत्येक आंदोलनात ते सक्रिय असायचे. परंतु जिल्हाप्रमुख पदावर असतानाच त्यांचा अपघात झाला होता. त्यांना मोठी दुखापत झाली होती. तेव्हापासून ते राजकारणापासून अलिप्त होते. काही दिवसांपूर्वीच रघुनाथ मोरे यांचा मुलगा मिलिंद यांचा विरार येथील एका रिसॉर्टमध्ये हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला होता. रघुनाथ मोरे यांच्या पश्चात त्यांचे भाऊ, पुतणे, मुली, नातवंड असा परिवार आहे.

शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे हे हयात असताना रघुनाथ मोरे हे ठाणे शहरप्रमुख होते. आनंद दिघे यांचे ते अत्यंत जवळचे सहकारी होते. आनंद दिघे यांच्या सोबत प्रत्येक आंदोलनात ते सक्रिय होते. आनंद दिघे यांच्या निधनानंतर रघुनाथ मोरे यांच्यावर शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी ठाणे जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी सोपविली होती.

# डोंबिवलीत पालिकेचे पाटकर प्लाझा वाहनतळ सांडपाण्याने तुंबले

**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) :** येथील पूर्व रेल्वे स्थानक भागातील बाजीप्रभू चौकातील पाटकर प्लाझामधील पालिकेचे तळघरातील रिकामे वाहनतळ गेल्या काही दिवसांपासून सांडपाण्याने तुंबले आहे. या तुंबलेल्या पाण्याला दुर्गंधी आणि त्यावर डास निर्माण झाल्याने या भागात व्यवसाय करणारे व्यापारी त्रस्त आहेत. याप्रकरणी आम्ही पालिकेला पत्र दिली आहेत, असे येथील व्यापाऱ्यांनी सांगितले.

कल्याण डोंबिवली पालिकेची बाजीप्रभू चौकातील पाटकर प्लाझामध्ये तळघरात वाहनतळाची जागा आहे. तळ आणि पहिला मजला अशा व्दिस्तरीय वाहनतळाची येथे व्यवस्था आहे. ही वाहनतळे सुरू करण्यात यावीत म्हणून मागील सहा वर्षापासून उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, वाहतूक अधिकारी, रिक्षा संघटना प्रयत्नशील आहेत. यापूर्वी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी पुढाकार घेऊन हे वाहनतळ सुरू करण्याचा प्रयत्न केला होता. इतर राजकीय अडथळ्यांमुळे हा विषय नंतर मागे पडला.



पाटकर प्लाझा मधील तळघरातील रिकाम्या वाहनतळाच्या जागेत गेल्या काही दिवसांपासून दोन ते तीन फूट सांडपाणी तुंबले आहे. हे तुंबलेले पाणी वाहून जाण्यास मार्गिका नाही. अनेक दिवसांच्या या तुंबलेल्या सांडपाण्यामुळे या भागात दुर्गंधी पसरली आहे. त्यावर डास तयार झाले आहेत. चिमणी गल्ली, पाटकर प्लाझामध्ये व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांना त्याचा त्रास होत आहे. रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या प्रवाशांनाही त्याचा त्रास होतो. या वाहनतळाच्या तळघरातील सांडपाणी काढून हे वाहनतळ पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी नागरिक, व्यापाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

व्यापाऱ्यांच्या तक्रारींची गंभीर दखल घेऊन फ प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी या भागात दररोज जंतुनाशक, डीडीटी फवारणी करण्याचे आदेश आरोग्य विभागाला दिले आहेत. तसेच तळघरातील सांडपाणी बाहेर काढण्याच्या दृष्टीने काय उपाययोजना करता येतील यादृष्टीने त्यांनी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे हालचाली सुरू केल्या आहेत.

पाटकर प्लाझामधील तळघरातील वाहनतळाच्या जागेत सांडपाणी तुंबल्याच्या जागेत दररोज डीडीटी, जंतुनाशक फवारणी केली जात आहे. हे सांडपाणी बाहेर काढण्याच्या दृष्टीने हालचाली करत आहोत. या वाहनतळाच्या जागेचा पुरेपूर वापर करण्याच्या दृष्टीने आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त यांचे मार्गदर्शन घेत आहे.

# आमिर खानने अनेक वर्षानंतर लावली अवॉर्ड शोला हजेरी

अभिनेता आमिर खान अनेक वर्षांपासून अवॉर्ड शोजना जाणे टाळत आला आहे. १९९० च्या दशकात त्याच्या सिनेमांनी चांगली कमाई करूनसुद्धा अनेक अवॉर्ड शोमध्ये त्याला पुरस्कार न मिळाल्याने आमिरने अवॉर्ड शोला जाणे बंद केले होते. मात्र, आता अनेक वर्षांनंतर आमिर खानने एका पुरस्कार सोहळ्याला हजेरी लावली. 'रेड सी इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल' या आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिवलमध्ये झालेल्या एका पुरस्कार सोहळ्याला आमिर खानने हजेरी लावली होती.

'रेड सी इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल'चा चौथा सीझन जेद्दाह (सौदी अरेबिया) येथे भव्य स्वरूपात सुरू झाला आहे. या फेस्टिवलमध्ये हॉलीवूड आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक दिग्गज कलाकारांनी उपस्थिती लावली आहे.

या वर्षी फेस्टिव्हलच्या प्रमुख आकर्षणांपैकी एक म्हणजे ऑस्कर नामांकित अभिनेत्री एमिली ब्लंट हिला 'रेड सी ऑनरी अवॉर्ड'ने सन्मानित करण्यात आले. तिला आंतरराष्ट्रीय चित्रपटसृष्टीतील अतुलनीय योगदानाबद्दल हा सन्मान देण्यात आला. हॉलीवूडच्या एमिली ब्लंटबरोबरच बॉलीवूड सुपरस्टार आमिर खान आणि हॉलीवूड ॲक्शन हिरो विन डिझेल यांनाही या फेस्टिव्हलमध्ये गौरवण्यात आले.

अभिनेत्री ईवा लाँगोरियाने आमिर खानची ओळख करून दिली. ती आमिरची कायमच प्रशंसक राहिली असून तिने 'लगान', '३ इडियट्स' आणि 'दंगल' यांसारख्या त्याच्या चित्रपटांचे विशेष उल्लेख करून जागतिक चित्रपटसृष्टीसाठी त्याच्या योगदानाचे कौतुक केले. आमिरने हा सन्मान स्वीकारताना सांगितले की, "इतक्या प्रतिष्ठित फेस्टिव्हलमध्ये सन्मानित होणं ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे."

आमिर खानने अनेक वर्षांनंतर पुरस्कार सोहळ्याला हजेरी लावल्याने नेटकरी अवाक झाले आहेत. बॉलीवूडच्या मिस्टर परफेक्शनिस्ट आमिर खानला तो पुरस्कार सोहळ्याला का जात नाही ? असा प्रश्न एका मुलाखतीत विचारण्यात आला होता. यावर आमिरने त्याच्यासाठी कुठल्याही पुरस्कार सोहळ्यापेक्षा प्रेक्षकांचे मिळणारे प्रेम हाच खरा पुरस्कार आहे असे सांगितले होते.

रेड सी इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलच्या भव्य रेड कार्पेटवर हॉलीवूड आणि बॉलीवूड कलाकारांनी शोभा वाढवली.



# 'पुष्पा द रुल' हा सुकुमारचा सुमारपट !

उत्तम मिसळ खायला जावं आणि चमचमीत तिखट रस्सा मिळण्याऐवजी फक्त त्याच्या नावाखाली वाफाळलेलं गरम पाणी आलं तर काय वाटेल? साबुदाण्याची खिचडी खाताना गारेचे खडेच खडे लागले तर कसं वाटेल? गॅसचा फुगा दिसतो खूप छान पण तो उंचवर जाताना पाहण्यात एक मजा असते. पण असा फुगा उंच आकाशात जाण्याआधीच १०-१५ फुटांवरच फुटला तर काय होईल? हे विचारण्याचं कारणही तसंच आहे. 'पुष्पा २' नावाचा अल्लू अर्जुनचा सिनेमा म्हणजे हे तीन अनुभव घेण्यासारखाच आहे. 'पुष्पा 2' अर्थात 'पुष्पा द रुल' सिनेमाचं दिग्दर्शन सुकुमारने केलं आहे. मात्र हा सुकुमारचा सुमारपट आहे असंही या सिनेमाबाबत म्हणता येईल.

### पुष्पा २ सिनेमा बघायचा म्हणजे सहनशक्तीच हवी

पुष्पा २ जपानमधून सुरु होतो आणि चित्तूरमध्ये संपतो. संपतो म्हणजे खरंतर तिसऱ्या पार्टसाठी पुन्हा सुरुच होतो. पण ३ तास १० मिनिटांच्या काळात आपण प्रेक्षक म्हणून सिनेमा अक्षरशः सहन करत राहतो. अल्लू अर्जुन पुष्पाच्या आधीच्या ॲटीट्यूडमध्येही नीटसा वावरलेला नाही. काही प्रसंग उत्तम जमले आहेत. बाकी सिनेमा ३ तास १० मिनिटं सुरु



असतो म्हणून पहावा लागतो असाच आहे. फहाद फासिलचा व्हिलन म्हणजेच भंवर सिंह या भागात स्ट्राँग असेल असं वाटलं होतं कारण पुष्पा दर बिगनिंगच्या शेवटाकडे त्याची एंट्री झाली होती पण तो व्हिलनपेक्षा कॉमेडियन जास्त वाटतो. त्यामुळे त्याचा व्हिलनही रंगलेला नाही. पुष्पा द बिगनिंगला कथा होती, कथाबीज होतं. गाणी सुंदर होती, सिनेमाला हवा असतो तसा मसाला होता पण पुष्पा २ मध्ये फक्त कुरघोडी आहे, ॲक्शन सीन आहेत आणि अपेक्षित असणारा शेवट आहे.

### अतर्क्य आणि कथा हरवलेला सिनेमा

पुष्पा अर्थात पुष्पराज इतका बलाढ्य दाखवला गेला आहे की तो फक्त एक छोटासा प्रसंग घडल्याने आणि त्यात त्याचा अपमान झाल्याने थेट मुख्यमंत्री वगैरे बदलतो. या आणि अशा अनेक अतर्क्य गोष्टी सिनेमांत आहेत. सिनेमा सुरु झाल्यानंतर आपली पकड घेत नाही. प्रेक्षक म्हणून आपण सिनेमाशी कनेक्ट होत नाही त्यामुळे दर पाच मिनिटांनी ॲक्शन सीन. पुष्पराजची काहीतरी कुरघोडी या सगळ्यात आपली प्रेक्षक म्हणून फरफट होत राहते. कॅमेरा वर्क उत्तम आहे हीच काय ती जमेची बाजू पण त्यासाठी ३ तास १० मिनिटांचा सिनेमा सहन करायचा म्हणजे प्रेक्षकांच्या सहनशक्तीची अग्निपरीक्षा आहे.

### 'पुष्पा द बिगनिंग' जास्त सरस!

रक्तचंदन, त्याची होणारी तस्करी, सिंडिकेट, पुष्पा, त्याची प्रेमकहाणी या सगळ्याभोवती 'पुष्पा द बिगनिंग'ची कथा मस्तपैकी गुंफली होती. मात्र सिक्वलमध्ये सगळंच फसलं आहे. सिनेमाला कथा नावाचा काही प्रकारच नाही. गाण्यांमध्येही तेच झालं आहे. 'पुष्पा २' मधली गाणी म्हणजे त्रास आहेत. 'पिलिंग्स' हे गाणं म्हणजे पती-पत्नीने शय्यासोबत करण्याआधी काय काय आसनं करता येतील याचं उत्तम उदाहरण आहे जे सहन करावं लागतं. 'किसिक' नावाचं आयटम साँग आहे ते देखील अकारण येतं. 'अंगारोका अंबरसा लगता है मेरा सामी' हे एक गाणं सोडलं तर बाकी गाणी घुसडली आहेत. अगदी टायटल साँगही.. त्या गाण्यांना अर्थ नाही. ती येतात आणि आपण सहन करतो.

### रश्मिका मंदाना अत्यंत मख्ख चेहऱ्याने वावरली आहे

अभिनयाबाबत बोलायचं झालं तर रश्मिका मंदाना अत्यंत मख्ख चेहऱ्याने वावरली आहे. तिचा अभिनय फक्त सीनमध्ये चांगला झाला आहे. बाकीचा सिनेमाभर ती सामी सामी करत राहते आणि ते डोक्यात जातं. अल्लू अर्जुनचे फाईट सिक्वेन्स चांगले झाले आहेत पण अभिनयात त्यानेही मार खाल्ला आहे. तो जेव्हा देवीच्या रुपात नाच करतो ते पाहून कांताराची आठवण येते. पण तो नाच त्याने फक्कड जमवला आहे. फहाद फासिलची प्रवृत्ती ही लांडग्यासारखी आहे असं पहिल्या पार्टमध्ये वाटलं होतं. पण त्याचं या सिनेमात अक्षरशः माकड झालंय असं वाटून जातं. सॉरीचा एक प्रसंग सोडला तर अभिनयाच्या बाबतीत त्यानेही सपाटून मार खाल्ला आहे. बाकी त्याचा शेवट जसा होतो तेदेखील हास्यास्पदच आहे. इतर कलाकारांबाबत काही लिहिणंही दुरापास्त वाटतं आहे अशा पद्धतीने हे लोक पडद्यावर वावरले आहेत.

# गरिबांचा रणवीर सिंह म्हणणाऱ्यांना सिद्धार्थ जाधवने दिलं सडेतोड उत्तर

मराठीसह हिंदी सिनेसृष्टीत आपल्या दमदार अभिनयाने वेगळं स्थान निर्माण करणारा अभिनेता म्हणजे सिद्धार्थ जाधव. सिद्धार्थने आपल्या विनोदी शैलीने मराठी रसिक प्रेक्षकांच्या मनात एक अढळ स्थान निर्माण केलं आहे. त्याच्या एनर्जीचं नेहमी कौतुक केलं जातं. सध्या सिद्धार्थ 'स्टार प्रवाह'च्या 'आता होऊ दे धिंगाणा ३'मध्ये पाहायला मिळत आहे. या कार्यक्रमाच्या सलग तिसऱ्या पर्वाची सूत्रसंचालनाची जबाबदारी सिद्धार्थ जाधवकडे देण्यात आली आहे. अशातच सिद्धार्थने गरिबांचा रणवीर सिंह म्हणणाऱ्यांना उत्तर दिलं आहे.

अभिनेता सिद्धार्थ जाधवने नुकताच 'रेडिओ सिटी मराठी'शी संवाद साधला. यावेळी सिद्धार्थ जाधवने ट्रोलिंग विषयी भाष्य केलं. तो म्हणाला, "मराठीचा रणवीर सिंह, याला रणवीर सिंह चावला, गरिबांचा रणवीर सिंह असं मला बोलतात. तर बोलू दे, ठीक आहे. काहीही प्रोब्लेम नाही. आपण त्यांना अधिकार दिला. त्यांनी बोलावं. त्यांचं ते मत आहे. मला माझ्या स्टाइलमध्ये राहायला खूप आवडतं. मी या पद्धतीने कधीच गॉगल, स्पोर्ट्स शूज, गळ्यात चेन या झोनमध्ये नव्हतो."

पुढे सिद्धार्थ जाधव म्हणाला, "मी आताची स्टाइल खरंतर रणवीर सिंहकडूनच घेतली. एकदा 'सिम्बा' चित्रपटाच्या सेटवरती एक दादा होते. त्यांच्या व्हॅनिटीमध्ये खूप कपडे होते. त्यात फटाक्यांसंबंधीत काहीतरी सूट होता.



# दिलजीत दोसांझच्या कॉन्सर्टमध्ये दीपिका पादुकोणने घेतली एन्ट्री

अभिनेता व गायक दिलजीत दोसांझच्या 'दिल-ल्युमिनाटी टूर २०२४'चे कॉन्सर्ट भारतासह जगभर गाजत आहेत. सध्या भारताच्या विविध शहरांत हे कॉन्सर्ट होत आहेत. प्रत्येक शहरात दिलजीतने गायनाचे सादरीकरण केल्यावर तिथे त्या कॉन्सर्टची चर्चा होते. आता दिलजीतच्या बेंगळुरूमधील कॉन्सर्टची चर्चा होत आहे. कारण- या कॉन्सर्टमध्ये बॉलीवूड अभिनेत्री दीपिका पदुकोण सहभागी झाली होती. दीपिका पदुकोणला या कॉन्सर्टमध्ये पाहून चाहत्यांना सुखद धक्का बसला. अभिनेत्री दीपिका पदुकोणला सप्टेंबर महिन्यात कन्यारत्न प्राप्त झाले. दीपिका तिच्या लाडक्या लेकीच्या जन्मानंतर पहिल्यांदाच सार्वजनिक ठिकाणी उपस्थित होती.






सध्या दीपिका आणि दिलजीत यांचे या कॉन्सर्टमधील अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. इन्स्टाग्रामवर व्हायरल झालेल्या एका व्हिडीओमध्ये दिलजीत आणि प्रेक्षक दीपिकाचे स्वागत करताना दिसत आहेत. दीपिका मंचावर आली तेव्हा प्रेक्षकांना तिने हात दाखवला, नमस्कार केला आणि त्यानंतर दिलजीतला मिठी मारत थोडा वेळ त्याच्याबरोबर तिने डान्सही केला.

एक व्हिडीओत दिलजीत दीपिकाचे कौतूक करताना दिसत आहे. तो म्हणाला, "तिनं खूप सुंदर काम केलं आहे. आपण तिला मोठ्या पडद्यावर पाहिलं आहे; पण इतक्या जवळून कधी पाहू, असं कधी वाटलं नव्हतं.

# तुमच्या मते देव म्हणजे काय? नाना पाटेकर म्हणाले...

लोकप्रिय अभिनेते नाना पाटेकर हे 'तिरंगा', 'क्रांतिवीर', 'नटसम्राट', अशा अनेक गाजलेल्या चित्रपटांसाठी ओळखले जातात. त्याचबरोबर नाना पाटेकर हे त्यांच्या स्पष्टवक्तेपणासाठीही ओळखले जातात. नुकतीच त्यांनी बोल भिडू या यूट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी त्यांचे बालपण, शाळेतील आठवणी, अभिनय क्षेत्रात ते का आले, स्मिता पाटील यांच्यामुळे ते सिनेमात आले, त्यांच्या आवडत्या कविता, सिनेमाचा प्रवास अशा अनेक गोष्टींबद्दल वक्तव्य केले आहे. याचबरोबर आता या टप्प्यावर त्यांना सगळ्यात महत्त्वाचं काम काय वाटतं, यावरदेखील त्यांनी चर्चा केली आहे. 'बोल भिडू'ने घेतलेल्या या मुलाखतीत त्यांना विचारण्यात आले की, नट, अभिनेता म्हणून तुम्ही मैलाचा दगड गाठला आहे. आता या टप्प्यावर सगळ्यात महत्त्वाचं काम काय वाटतं? त्यावर बोलताना नाना पाटेकर यांनी म्हटले, "आता ही सामाजिक विसंगती आहे आणि ती आपल्या या कॅमेऱ्याच्या माध्यमातून दूर करता येईला का आपल्याला? तसे विषय हाताळणं आणि मुळात जात व धर्म या आपण घरात पाळायच्या गोष्टी आहेत. त्यावर त्यांना विचारले गेले की, तुमच्या मते देव म्हणजे काय? त्यावर नाना पाटेकरांनी म्हटले, "देश. माझ्या मते, देव ही संकल्पना देश असेल. माझी माणसं जिवंत असतील, तर मी आहे. मला स्वतंत्र अस्तित्व नाहीच आहे. बाहेरच्या देशात गेल्यानंतर तुला काय विचारतात? तुझं नाव काय आहे? अच्छा! भारतीय? ही आपली ओळख आहे; मग तो कुठल्याही धर्माचा असेल. बाहेरच्या देशात गेल्यावर आपण कसे एकत्र अगदी छान असतो. इथे असल्यावर मग का भांडतो? इथे आमचे पॉलिटिशियन्स आहेत, जे आपल्यामध्ये अभेद्य भिंती बांधत आहेत. ते तुम्ही एकदा ओळखायला शिका." "काही काही वेळेला मला असं वाटतं की, आपण नक्षलवादी झालो, तर तुम्ही काय करणार- दोन चार माणसांना मारणार. माणसांना मारून ही वृत्ती संपणार आहे का? तर नाही. मग ती वृत्ती संपवायला हवी. मग त्यासाठी काय करता येईल? तर जितकं जमेल तितकं माझ्याकडे कॅमेरा हे माध्यम आहे. त्याचा मी किती सकारात्मकतेनं विचार करतोय आणि वापर करतो. हे फार छान माध्यम आहे. सोशल मीडियावरचे सगळेच चांगले आहेत, असं नाही. पण, त्यातून तुम्ही खूप काही करून घडवू शकता.



**मेष** – स्वकौशल्याने तोट्याचे नफ्यामध्ये रूपांतर कराल. धावपळ व दगदग होईल. आगंतुक पाहुणे येतील. नवीन ओळखी होतील.

**वृषभ** – प्रिय व्यक्तीशी संपर्क करणे शक्य होईल. कामात किरकोळ अडचण येईल. प्रकृतीची काळजी घ्या. कौटुंबिक गरजा समजून घ्या.

**मिथुन** – प्रलंबित देणी फेडाल. मानसिक आघातावर आपण धैर्याने मात कराल. सौम्य शब्द वापरा. समाजात मान आणि प्रतिष्ठा वाढेल.

**कर्क** – जोडीदाराचा भक्कम पाठिंबा मिळेल. मानसिक ताण असला तरी आरोग्यावर परिणाम होणार नाही. कोर्ट केसमध्ये यश मिळेल.

**सिंह** – अतिउदार स्वभावामुळे गैरफायदा घेतला जाईल. काही कारणाने मन अस्थिर होईल. अनपेक्षित भेटवस्तू मिळेल. धंद्यात वाढ होईल.

**कन्या** – आपली आर्थिक आवक समाधानकारक राहील. काटेकोरपणे बोलणे टाळा. कोर्टकेस जिंकाल. प्रतिष्ठा मिळेल. जुन्या आठवणी येतील.




**तूळ** – तुमच्याशी स्पर्धा करणारे लोक वाढतील, पण सकारात्मक दृष्टिकोनामुळे अनेक अडचणींवर सहज मात कराल. थकवा दूर होईल.

**वृश्चिक** – योजनांना गती देता येईल. रेंगाळत राहिलेली कामे पूर्ण कराल. मनाची अस्थिरता कमी होईल. आहारावर नियंत्रण ठेवावे.

**धनु** – साहस व पराक्रमामुळे आपला आत्मविश्वास वृद्धिंगत होईल. घाईने निर्णय घेणे टाळावे. अचानक काही अपरिहार्य खर्च संभवतात.

**मकर** – मानसिक शांतता आणि प्रसन्नता लाभेल. आर्थिक व्यवहार सावधगिरीने करावेत. वाहन चालवताना विशेष काळजी घ्यावी.

**कुंभ** – आध्यात्मिक आवड वाढेल. आवडीचे काम करण्याची संधी मिळेल. मोसमी आजार त्रस्त करू शकतात. इतरांना मदत करावी लागेल.

**मीन** – मिळकतीचे नवे स्रोत सापडतील. किरकोळ समस्यांना सामोरे जावे लागू शकेल. गैरसमज दूर होतील. आनंदाची अनुभूती घ्याल.

# मुलींनी घेतली एचआयव्ही तपासणी केल्याशिवाय विवाह न करण्याची शपथ

**अंबाजोगाई (विशाल पाटील) -** दिनांक ७ डिसेंबर रोजी जागतिक एड्स दिन आणि पंधरवडा निमित्ताने आज अंबाजोगाई येथील वेणूताई चव्हाण महिला कला वाणिज्य महाविद्यालय अंबाजोगाई या ठिकाणी रेड रिबीन क्लबच्या अंतर्गत व स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयव रूग्णालय चा आयसीटीसी यांच्या संयुक्त विद्यमानाने एचआयव्ही जनजागृती आणि एचआयव्ही तपासणी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाचे समुपदेशक श्री धनराज पवार हे उपस्थित होते तसेच महाविद्यालयाचे प्रयोगशाळा तंत्रज्ञ विश्वास लवंद सर हे पण



या कार्यक्रमाला उपस्थित होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य माननीय श्रीमती अखिल गौस मॅडम ह्या होत्या तर एनएसएस प्रमुख श्री चव्हाण सर काशीद सर, संध्या ठाकरे मॅडम व इतर सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या उपस्थित होते सुरुवातीला महाविद्यालयाच्या वतीने मा श्री धनराज पवार यांचे तसेच विश्वास लवद यांचा स्वागत करण्यात आले त्यानंतर महाविद्यालयाच्या वतीने रेड रिबीन क्लब चा माध्यमातून जे काही कार्यक्रम चालतात याबद्दल विभागाचे प्रमुख श्री चव्हाण सर यांनी सखोल अशी माहिती दिली या यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री धनराज पवार समुपदेशक यांनी व उपस्थित मुलींना असा सल्ला दिला की आपल्या जीवनामध्ये आपण जगत असताना आपल्याला जे काही पाहिजे ते आपण मिळवण्यासाठी कोणत्याही प्रयत्नाला मागे पडत नाहीत परंतु आपल्याला ज्या वेळेस विवाह करायचा असतो त्यावेळेस समोरील मुलांचे किंवा मुलीचे फक्त प्रॉपर्टी आणि इतर गोष्टीचा आपण हवास करतो पण त्याचे आरोग्य कार्ड न तपासताच त्याच्यासोबत आपण विवाह करतो असं न करता प्रत्येक मुलीने विवाह करण्यापूर्वी समोरील मुलाची किंवा मुलाचा एचआयव्ही तपासणी रिपोर्ट इतर सर्व आजाराची तपासणी अहवाल करूनच त्याच्यासोबत विवाह करावा असे आव्हान करण्यात आले यानंतर उपसस्थीत मुलींनी अतिशय चांगल्या प्रतिसाद देत मुलींनी असे सांगितले की सर आम्ही जेव्हा आमचे विवाह होतील ते एचआयव्ही तपासणी किंवा इतर तपासण्या केलेल्या असलेल्या मुलासोबतच करू असा मुलींनी शपथ घेतली यानंतर महाविद्यालयाच्या प्राचार्य अखीला गोस मॅडम यांनी अध्यक्षीय समारोप केला करताना त्यांनी सांगितलं की महाविद्यालयाच्या वतीने मागील तीन-चार वर्षांपासून रेट रिबीन क्लबच्या माध्यमातून असंख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आले त्यासाठी आम्ही धनराज पवार सरांचे आभार व्यक्त केले त्यांनी असे कार्यक्रम आमचा कॉलेज चालु करून दिल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले त्यानंतर आभार प्रदर्शन काशीद सरांनी केले.

# राहुल नार्वेकर यांची दुसऱ्यांदा विधानसभा अध्यक्षपदी निवड होणार

**मुंबई (राकेश गायकवाड) -** पुन्हा एकदा विधानसभा अध्यक्षपदी भाजपाचे आमदार राहुल नार्वेकर यांची निवड होणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. राहुल नार्वेकर यांनी आज सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत विधानसभा अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला. त्यांच्या विरोधात अद्याप कोणीही अर्ज दाखल झालेला नसल्याने त्यांची बिनविरोध निवड होण्याची शक्यता आहे.

कालपासून विधिमंडळाचे 'विशेष अधिवेशन' सुरू आहे. शनिवारी, रविवार या दोन



दिवसांत २८८ आमदारांना विधानसभा सदस्यत्वाची आणि गोपनीयतेची शपथ देण्यात येत आहे. हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांची हंगामी आज विधानसभेत उर्वरित आमदारांना शपथ दिली. यानंतर उद्या ९ डिसेंबर रोजी विधानसभा अध्यक्षांची निवड करण्यात येणार असल्याने अधिकृतपणे आज अर्ज दाखल करण्यात आले.

राहुल नार्वेकर यांच्या विरोधात विरोधी व इतर पक्षांकडून एकाही उमेदवाराने अर्ज दाखल केलेला नाही. त्यामुळे राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्षपदी बिनविरोध निवड होणार असल्याचे निश्चित मानले जात आहे. विधानसभा अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज दुपारी १२ वाजेपर्यंत होती. मात्र इतर कोणत्याही पक्षाच्या एकही उमेदवाराने अर्ज दाखल केलेला नाही. अशातच यावेळी महायुतीकडे प्रचंड संख्याबळ आहे. त्यामुळे राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्षपदी वरील निवड होणार यात शंका नाही.

**SPORT**

# Mohammed Siraj Breaks Shoaib Akhtar's Fastest Ball Record?

**New Delhi -** It was a pleasant experience for Australian fans in the ongoing second Test match against India in Adelaide on Friday. Close to 50,000 fans were there at the Adelaide Oval to see the toughest clash between India and Australia in a pink-ball game.

The Indian batters struggled on the opening day of the second Test as they looked clueless in front of the Australian bowlers. Veteran pacer Mitchell Starc unleashed fire as he scalped six wickets and restricted India to just 180 runs.

When India started bowling, it was Mohammed Siraj who made headlines after getting involved in a heated argument with Marnus Labuschagne in his last over of Day 1. But then the heated banter did not catch fans' attention much but one thing did. Siraj bowled the fastest bowl in the history of cricket and it looked like he broke Shoaib Akhtar's record of 161.3 kmh. Fans were shocked to see Siraj clocking the speed of 181.6 kmh as the ball went down the leg and Labuschagne was on strike.

After a while, everyone came to know that it was a technical glitch



from the broadcasters, who quickly corrected the error. But social media went berserk after the speed gun's fault.

Australia Squad: Pat Cummins (C), Alex Carey (WK), Usman Khawaja, Nathan McSweeney, Marnus Labuschagne, Steven Smith, Travis Head, Mitchell Marsh, Mitchell Starc, Nathan Lyon, Josh Hazlewood, Josh Inglis, Scott Boland.

India Squad: Rohit Sharma (C), Yashasvi Jaiswal, KL Rahul, Devdutt Padikkal, Virat Kohli, Rishabh Pant(w), Dhruv Jurel, Nitish Reddy, Ravichandran Ashwin, Akash Deep, Jasprit Bumrah(vc), Mohammed Siraj, Sarfaraz Khan, Prasidh Krishna, Ravindra Jadeja, Harshit Rana, Washington Sundar, Abhimanyu Easwaran.

Lut practui cae quem que iam. Id C. Bonis? Tum noveme in nonsceri publibultus et, quam moeroptiorum publicultus, quon actam ut perbitus inpratri tala vestilius consul vit; nos vius.

Ununum plia sentracte is. conemni tandis hum mactus etionit C. Ra L. Gracchui ines con vehebat, sintu menatoditi, intum movenih ilicam essimilla terfex moreo, etiu in nemus, nos in audam prora, omnestra vivivas damquit, patqui publiam potabem, Cuperum dicatqui sente pulla de num trum erorudem erum conox mendam.

# Rohit or Kohli need to go and tell him, he's disrespecting the game : Australia legend hammers Mohammed Siraj

**New Delhi -** Mohammed Siraj has become the subject of intense scrutiny and backlash following his fiery send-off to Australian centurion Travis Head on Day 2 of the second Test at Adelaide Oval. The incident, which occurred after Siraj dismissed Head for a blistering 140 off just 141 balls, has not only ruffled feathers in the Australian camp but also drawn criticism from former cricketing legends. Head himself, speaking to Fox Cricket after his dismissal, admitted to being "slightly disappointed" by the aggressive reaction from Siraj. "If they want to react like that, and if that's how they want to represent themselves, then so be it," Head said, indicating his displeasure with the fiery exchange.

Siraj's actions did not go unnoticed by the Adelaide crowd, who responded with boos for the rest of Australia's innings, with the bowler likely to face similar treatment when he takes to the crease himself on Day 3. The incident has caused a stir both on and off the field, with many believing Siraj crossed the line in terms of sporting conduct.



Former Australian captain Mark Taylor has condemned the bowler's behavior as "disrespecting the game." On the Willow Talk podcast, Taylor took issue not only with the send-off of Head but also with Siraj's repeated "celebrappeals," where he celebrates wickets before even looking back at the umpire, often to find the batter not out. This happened most recently when Siraj thought he had trapped Marnus Labuschagne LBW, only for the umpire to rule the appeal as not out.

Taylor stated, "I don't know who instigated it, but it's not a good look, particularly when a guy makes 140," referring to Siraj's confrontation with Head. The former Australian great further added, "I'd like to see someone have a little word to Mohammed Siraj." Taylor, who has always valued aggression in bowlers, expressed concerns over Siraj's approach. "I like his competitive nature, he's a fine bowler… I don't like the fact that when he hits a guy on the pads, and he thinks he's got him out LBW, he continues to run down the pitch, past the batsman, almost gets to the keeper and then looks around to the umpire to see if he's going to give it out."

aylor believes this kind of behavior is detrimental to the game and should be reined in before it escalates further. "That's got to stop, and if it doesn't stop shortly, someone – and it'll be the umpires or the match referee – might stop it for him, and give him a game off. We don't want that," he cautioned.

**Rohit, Kohli should have word with him**

Taylor also urged senior Indian players, particularly captain Rohit Sharma and former captain Virat Kohli, to have a word with Siraj and guide him toward more respectful conduct on the field.

"Someone like a Rohit Sharma or Virat Kohli needs to go up to him, and say 'mate, yeah be excited, be aggressive, get in batsmen's face, love all that, but that is disrespecting the game and the umpire,'" Taylor suggested.

## Sumit Nagal Gets Direct Entry Into Australian Open, Will Play Fifth Grand Slam In A Row



**New Delhi -** India's top singles player Sumit Nagal has secured a direct entry into the Australia Open 2025, making his second appearance in the year's first Grand Slam which will be played in Melbourne from January 6-26.

Nagal, who is ranked 98th in the ATP World Rankings, is one of the last singles players to confirm a direct entry into the 128-player draw.

This is Nagal's fifth direct entry into a Grand Slam main draw and eighth overall, having played all four Grand Slam events in 2024. His best result at a Grand Slam event is reaching the second round at the Australian Open and the US Open, both of which he did this year.

The 27-year-old Nagal, who was born in Jaitpur, Haryana, will be playing for the third time in the Australian Open. The entry list was announced in Melbourne on Friday.

Nagal is the 2015 Junior Wimbledon champion, becoming the sixth Indian player to win a junior Grand Slam title. The Davis Cupper has a best-ever ranking in singles of 68 that he achieved in the week starting July 15, 2024. At the Australian Open 2025, Nagal will be hoping to improve his best performance and reach the third round if he gets a good draw.

# Here's How India Can Still Qualify For World Test Championship 2025 Finals

**New Delhi -** Australia defeated India by 10 wickets in the second Test at Adelaide Oval, which took place from December 6 to 8, 2024. After knocking India out for 180 runs in the first innings, Mitchell Starc excelled with 6 wickets for 48 runs, while Pat Cummins added 5 wickets in the second innings, reducing India to 175. Despite a valiant 42 from Nitish Kumar Reddy, India struggled to match Australia's pace onslaught. Australia successfully chased a modest 19-run target without losing a wicket, resulting in a 1-1 series.

Following their loss to England in the second Test, New Zealand's downhill slide continues a week after a significant upheaval in the ICC World Test Championship (WTC) 2024-25 standings. Australia's strong Pink Ball Test performance, meantime, has helped them climb the WTC rankings. Over India, they have triumphed.

Australia levelled the five-match series 1-1 by 10 wickets in the Pink Ball Test, therefore enhancing their prospects of landing a position in the WTC final in London.

Once a fierce rival for the 2025 WTC final, New Zealand has plummeted to sixth place with a devastating



Wednesday defeat to England on Sunday.

If India wins the BGT 3-1, they will remain in the top two places in the WTC ranks. Still, their status also relies on the situation of South Africa. Should the Proteas triumph in their second Test against Sri Lanka (having won the first by 233 runs), they might propel India to the top.

An India 3-2 victory over Australia would create some uncertainty. India would need Sri Lanka to at least draw one of their two forthcoming tests against Australia, scheduled for January-February next year, if they were to keep their top two position. India's qualifying gets more difficult if the series ends in a 2-2 tie between Australia and India. Then, they would require: South Africa to win their series 2-0 against Sri Lanka. Sri Lanka to defeat Australia by at least a 1-0 margin in their two-Test series. India would be in a tough spot if they lost the series 2-3 because their qualifying would depend on a number of factors:

New Zealand must draw 1-1 with England.

South Africa must draw their series 1-1 with both Sri Lanka and Pakistan.



# महापरिनिर्वाण दिनी पंचशील बौद्धजन सेवा संघाचे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन

● बोरघर, भावना जैन :

पंचशील बौद्धजन सेवा संघ गोरेगाव विभाग यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकातील संबोधी विहार येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र अस्थी स्मारकात जातन करण्यात आल्या आहेत. त्या ६ डिसेंबर, २०२४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनाला संबोधी विहारात पवित्र अस्थी दर्शनाला ठेवण्यात आल्या होत्या. या ठिकाणीं अनेकांनी येवून महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र अस्थींचे दर्शन घेतले. रायगड जिल्ह्यामध्ये एकमेव ठिकाणी गोरेगाव येथे पंचशील बौद्ध जन सेवा संघाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र अस्थी जतन करून ठेवल्या आहेत. पंचशील बौद्ध जन सेवा संघ ही रायगड जिल्ह्यामध्ये नावजलेली सामाजिक संस्था आहे. पंचशील बौद्धजन सेवा संघ गोरेगाव विभागचे अध्यक्ष आयु. विकास दादा गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली ६ डिसेंबर, २०२४ रोजी अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला बौध्दजन पंचायत समितीचे अध्यक्ष आयु चंद्रमणी साळवी, प्राध्यापक सोनवणे, म्हसळा तालुका सचिव आयु रुपेश गमरे, विश्वस्त सचिव संदीप साळवी, विश्वस्त डॉ. दिलीप साळवी, तुकाराम महाडिक महिला जिल्हा अध्यक्ष अस्मिता जाधव, पंचशील महिला सेवा संघाच्या अध्यक्षा सुप्रिया ताई साळवी यांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून श्रध्दांजली अर्पण केली.

## मुबलक पाण्याची प्रतीक्षाच !

# सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचे 90 टक्के काम पूर्ण

● मुंबई, विशाल पाटील :

सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा प्रकल्पातील दुसऱ्या टप्प्याचे काम संथगतीने सुरू आहे. त्यामुळेच दुसरा टप्पा कार्यान्वित करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) मुदत गाठता येणार नसल्याचे चित्र आहे. प्रकल्पपूर्तीसाठी मुदतवाढ दिली जात आहे. दुसऱ्या टप्प्याचे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. ते पूर्ण होण्यासाठी आणखी सहा महिन्यांचा कालावधी लागेल. त्यामुळे दुसरा टप्पा कार्यान्वित करण्यासाठी जून २०२५ चा मुहूर्त ठरला आहे. 'एमएमआरडीए' ने सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा प्रकल्पातून पहिल्या टप्प्याअंतर्गत वसई-विरार महापालिकेसाठी पाणी सोडण्यास सुरुवात केली आहे.



### चार किलोमीटरपर्यंत कामे पूर्ण

२०२१ नंतर एमएमआरडीएने कामाला गती दिली. त्यामुळेच जून २०२३ मध्ये या प्रकल्पातील पहिला टप्पा पूर्ण झाला आणि त्यानंतर काही महिन्यांनी वसई-विरारला पहिल्या टप्प्यातून पाणीपुरवठा सुरू झाला. त्यानंतर दुसऱ्या टप्प्याच्या कामाला वेग देऊन आजवर तो कार्यान्वित होणे अपेक्षित होते. प्रकल्प कार्यान्वित होण्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी लागणार असल्याची माहिती एमएमआरडीएतील सूत्रांनी दिली. चार किमीपर्यंतच्या जलवाहिनीचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम सुरू असून पाण्यांच्या टाक्यांचेही काम सुरू असल्याचेही सूत्रांनी सांगितले.

या प्रकल्पाअंतर्गत मीरा-भाईंदर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या दुसऱ्या टप्प्याचे आतापर्यंत ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. वसई-विरार आणि मिरा-भाईंदरमधील पाणीटंचाईचा प्रश्न मार्गी लावून या शहरांना मुबलक पाणीपुरवठा करण्यासाठी सुमारे १,३२५.७८ कोटी रुपये खर्चाचा सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा प्रकल्प 'एमएमआरडीए'ने हाती घेतला. या प्रकल्पाअंतर्गत ४०३ दशलक्ष लिटर क्षमतेने पाणीपुरवठा करण्यात येईल. प्रकल्पाच्या कामाला २०१७ मध्ये सुरुवात झाली. प्रारंभापासून ३४ महिन्यांत हा प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र अनेक तांत्रिक अडचणी, भूसंपादन आणि इतर अडचणींमुळे काम संथगतीने सुरू होते.

# नागरिकांची स्वच्छतेबाबतीत मानसिकता नसल्यामुळे घाणीचे साम्राज्य

● माथेरान , धनश्री सट्टा :



माथेरान मधील काही भागातील नागरिकांची स्वच्छता बाबतीत मानसिकता नसल्यामुळे त्या त्या भागात घाणीचे साम्राज्य पसरले असून अभ्यासू , सुशिक्षित नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नगरपरिषदेमार्फत नियमितपणे कचरा वेचक महिला कचरा संकलन करण्याचे काम निमितपणे करीत असतात. परंतु काही नागरिक जाणून-बुजून आपल्या जवळील ओला सुका कचरा आजूबाजूच्या गटारात फेकत असल्यामुळे त्या त्या भागात दुर्गंधी पसरलेली असून घाणीचे साम्राज्य दिसून येत आहे. गावातील अनेक ठिकाणी घरगुती लॉजिंग पर्यटकांच्या सेवेसाठी उपलब्ध आहेत त्या लॉजिंग मधील प्लास्टिक बाटल्या तसेच अन्य कचरा नियमितपणे येणाऱ्या कचरा वेचक महिलांकडे न देता काहीजण बाजूच्या गटारात टाकत असल्यामुळे यावर तोडगा काढण्यासाठी आणि जे अस्वच्छता राखत आहेत यांना वठणीवर आणण्यासाठी ज्याप्रमाणे गावातील मुख्य रस्त्यांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत त्याचप्रमाणे नगरपरिषदेने वस्तीच्या ठिकाणी जागोजागी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे गरजेचे बनले आहे.

त्यामुळे जो कोणी कचरा गटारात टाकेल त्यांच्यावर स्वच्छता विभागामार्फत दंडात्मक कारवाई करता येऊ शकते. काही नागरिकांनी आपल्या घरातील शौचालयासाठी सेफ्टी टॅंक बांधलेले नसल्यामुळे शौचालयाचा पाईप थेट गटारात सोडल्याने सर्व घाण त्या गटारात पडत असते त्यामुळे सफाई कामगारांना या दुर्गंधीमुळे स्वच्छता करणे खूपच कठीण बनलेले आहे. स्वच्छता विभागाच्या अधिकाऱ्यांनी नियमितपणे गावात फेरफटका मारून पाहणी करणे आवश्यक असल्याचे सुज्ञ नागरिकांमधून बोलले जात आहे.

# रँक ऑरगॅनिक कारखान्यात तीन कामगार होरपळून जखमी...

■ कामगार, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागाकडून वेगवेगळ्या प्रतिक्रिया
■ आग नेमकी कशामुळे लागली कारखाना प्रशासनाचे तोंडावर बोट

● पालघर, सुचिता सोनावणे:

तारापूर औद्योगिक क्षेत्रातील रँक ऑरगॅनिक कारखान्यात तीन कामगार होरपळून जखमी झाले आहेत. दिनांक २९ नोव्हेंबर २०२४ रोजी पहाटे उत्पादन प्रक्रिया सुरू असताना अचानक उडालेल्या आगीच्या भडग्यात चंद्रकांत बापू घरत ५१ वर्षे, दिपक करलेकर ३९ वर्षे व प्रविण तळपे २८ वर्षे हे तीन कामगार आगीत जब्बर होरपळून जखमी झाले आहेत. त्यांना तातडीने बोईसर येथील संजीवनी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलेले असून तीघ्यांची प्रकृती आता स्थिर असल्याचे डॉ भानुशाली यांनी सांगितले आहे.

सेंटर फ्युज या यंत्रातून प्लॅस्टिक ड्रम मधे एस एस एफ नावाचा उत्पादन पावडर हाताळताना आग लागून कामगार जखमी झाल्याचे दिसून येत असून थंडीच्या दिवसात मानवी उर्जा तयार होऊन ज्वलनशील रसायनाला आग लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुढील कार्यवाही सुरू आहे तपासाअंती योग्य ती कारवाई केली जाईल : अमोल बाईत - उपसंचालक औ. सुरक्षा व आरोग्य विभाग पालघर दरम्यान दिनांक २९ नोव्हेंबर रोजी पहाटे



आगीच्या भडग्यात होरपळलेल्या कामागारांची प्रकृती आता स्थिर असून ५१ वर्षीय कामगार चंद्रकांत घरत हे १७ ते १८ % भाजलेले असून त्यांना उच्च डायबिटीस असल्यामुळे उपचारासाठी वेळ लागत असून ३१ वर्षीय कामगार दिपक करलेकर हे २० % आगीत भाजलेले असून यांना उपचारादरम्यान डायबिटीस असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच २८ वर्षीय कामगार प्रविण तळपे हा १९ % आगीत



भाजलेला आहे. तर कामगार व उपसंचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभाग पालघर यांनी दिलेल्या वेगवेगळ्या माहितीनुसार नेमकी आग कशामुळे लागली यात शंका निर्माण होत असून कारखाना प्रशासनाने कुठलीच माहिती देण्याचे टाळल्यामुळे मोठी शंका उपस्थित केली जात आहे. तसेच कारखाना प्रशासन कामगारांच्या जीवीताशी खेळत पुरेसे सुरक्षा उपकरणे उपलब्ध करून देत नसल्याचे देखील दिसून येत आहे.

■ रात्रीपाळी सुरू असताना ५ हजार लिटर क्षमतेच्या वेसलमधे प्रक्रिया सुरू असताना मेनव्होल खोलून कच्चामाल टाकत असताना आगीचा बडगा तोंडावर आल्यामुळे डावा हात व तोंडावर भाजले आहे : चंद्रकांत बापू घरत

**- कामगार रँकऑरगॅनिक**

■ उत्पादन प्रक्रिया सुरू असताना दोन्ही हात व तोंडावर भाजले आहे. त्यामुळे आता डायबिटीस देखील झाली आहे पोलीसांनी जबाब घेतला आहे.

**- दिपक करलेकर - कामगार रँक ऑरगॅनिक**

■ उत्पादन प्रक्रिया सुरू असताना अचानक तोंडावर आगीचा बडगा उडाला दवाखान्यात आल्यावर समजले दोन्ही हात व तोंड भाजले आहे.

**- प्रविण तळपे - कामगार रँक ऑरगॅनिक**

# मुख्यमंत्र्यांच्या शहरात १५ हजार कोटींची गुंतवणूक

● नागपूर, नितीन देवळेकर :




शहराजवळील बुटीबोरी पंचतारांकित औद्योगिक वसाहतीत जेएसडब्ल्यू कंपनीला लिथियम- आयन बॅटरी प्रकल्प उभारण्यासाठी सलग ६०० एकर जमीन हवी आहे. परंतु सलग एवढी जमीन अतिरिक्त बुटीबोरी एमआयडीसीत उपलब्ध नसल्याने राज्य सरकारने ४५० एकर जमीन देऊ केली आहे.

राज्य सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी जेएसडब्ल्यू समूह नागपुरात गुंतवणूक करीत असल्याची घोषणा केली होती. तसेच त्यावेळी घोषणा झालेल्या फ्रान्सच्या पर्नो रिका कंपनीचे 'माल्ट डिस्टिलरी अँड मॅन्युफॅक्चरींग' आणि अवाडा ग्रुपच्या अवाडा इलेक्ट्रो या नवीन प्रकल्पाचे काम सुरू झाले आहे. जेएसडब्ल्यू कंपनीला प्रस्ताव पत्र देण्यात आले आहे. ही कंपनी पहिल्या टप्प्यात १५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे.

सेलफोनपासून इलेक्ट्रिक वाहनांपर्यंत बॅटरीचे वेगवेगळे उपयोग आहेत. एमआयडीसीच्या बुटीबोरी औद्योगिक वसाहतीत कंपनीला ४५० एकर जमीन देऊ करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात लिथियम बॅटरी प्लांटचा समावेश असेल आणि नंतर इतर उत्पादनांच्या श्रेणींसाठी ही सुविधा वाढवली जाण्याची शक्यता आहे. अवाडा ग्रुप ही दुसरी एक कंपनी मार्चपर्यंत उत्पादनाचा पहिला टप्पा सुरू करणार आहे. बांधकाम जोरात सुरू असल्याची माहिती आहे. यावर्षी ऑक्टोबरमध्ये बुटीबोरी येथे 'अवाडा'ने आपल्या सौर मॉड्यूल आणि इलेक्ट्रोलायझर प्रकल्पाची पायाभरणी केली. वर्षभरात उत्पादन सुरू होईल, असा कंपनीचा विश्वास आहे. १३ हजार कोटी रुपयांपर्यंत ही कंपनी गुंतवणूक करणार आहे. "जेएसडब्लू कंपनीला सलग ६०० एकर जमीन हवी आहे. तेवढी सलग जमीन उपलब्ध नाही. त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न सुरू आहे.

# 'मिशन अयोध्या'चे थेट विषय मांडणारे पोस्टर प्रदर्शित!

## 'पुष्पा २' सोबत 'मिशन अयोध्या'ची स्टॅटिक झलक वाढवतेय रसिकांची उत्कंठा!! भक्तिभावाचे सुवर्ण पर्व २३ जानेवारी २०२५ पासून तुमच्या भेटीला !!!

● मुंबई, राकेश गायकवाड :

अयोध्येच्या पवित्र भूमीशी जोडलेला आणि मराठी प्रेक्षकांच्या हृदयाला भिडणारा 'मिशन अयोध्या' चित्रपटाचा प्रवास, त्याच्या अत्यंत आकर्षक पोस्टरच्या प्रकाशनाने एका नवीन उंचीवर पोहोचला आहे. सामाजिक माध्यमांवर चर्चेचा विषय ठरलेले हे 'पोस्टर' आज 'पुष्पा २' या ब्लॉकबस्टर चित्रपटासोबत 'स्टॅटिक झलक' रूपात प्रदर्शित करण्यात आले. मराठी चित्रपटसृष्टीत प्रथमच अशा तोलामोलाच्या पोस्टरने उत्सुकता शिगेला पोहोचवली आहे.


'पुष्पा २' च्या इंटरवलमध्ये दिसलेली 'मिशन अयोध्या' ची १० सेकंदांची स्टॅटिक झलक प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेणारी ठरली आहे. भस्मासुरी आगीच्या वावटळीत उभ्या असलेल्या एका पाठमोऱ्या व्यक्तीचा शक्तिशाली प्रतिमाविष्कार, तिच्या हातातील प्रभू श्रीरामांच्या झेंड्याचा तेजस्वी अभिमान आणि पार्श्वभूमीवर ऐकू येणारी प्रभू रामांच्या नामाची भक्तिमय धून यांचा परिपूर्ण संगम प्रेक्षकांवर गारूड घालतो.

या अभिनव कॅम्पेनबाबत बोलताना दिग्दर्शक समीर रमेश सुर्वे म्हणाले, "पुष्पा -२ च्या माध्यमातून महाराष्ट्रातील प्रेक्षकांसमोर




प्रेरणादायी झलक मांडण्याचा आमचा उद्देश होता. 'मिशन अयोध्या'ची अवघ्या १० सेकंदांच्या स्टॅटिक पोस्टरला मिळालेला अभूतपूर्व प्रतिसाद हा चित्रपटाच्या यशाची नांदी आहे. महाराष्ट्रभर सुरू असलेल्या चर्चांमुळे 'मिशन अयोध्या' २३ जानेवारीपासून बॉक्स ऑफिसवर इतिहास घडवेल." या पोस्टरमध्ये संघर्ष, भक्तिभाव, आणि प्रेरणा यांचा अभूतपूर्व मिलाफ दिसतो. आगीच्या विळख्यात झेंड्याला घट्ट पकडून उभा असलेला व्यक्तीचा संघर्ष रामभक्तांच्या सशक्ततेचे प्रतीक आहे. यातून 'मिशन अयोध्या' हा केवळ एक चित्रपट नसून, भक्तिभावाचा सुवर्ण पर्व आहे, हे स्पष्ट होते, असे निर्माते कृष्णा दादाराव शिंदे व योगिता कृष्णा शिंदे यांनी म्हटले आहे. 'मिशन अयोध्या' हा अयोध्येत प्रभू श्रीराम मंदिराच्या स्थापनेनंतर चित्रित झालेला पहिला मराठी चित्रपट आहे. आर के योगिनी फिल्म्स प्रॉडक्शन प्रा. लि. च्या बॅनरखाली निर्माते कृष्णा दादाराव शिंदे आणि योगिता कृष्णा शिंदे यांनी या भव्य चित्रपटाची निर्मिती केली आहे. प्रख्यात दिग्दर्शक समीर रमेश सुर्वे यांच्या लेखन - दिग्दर्शनातून हा चित्रपट उभा राहिला आहे.

राममंदिर स्थापनेच्या पहिल्या वर्धापन दिनाचे औचित्य साधत, 'मिशन अयोध्या' २३ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्रातील चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे.



# महायुती एक्टिव मोडवर! बाजार समिती बरखास्त करीत खासदार गटास दिला झटका

● वर्धा, आकाश कांबळे :

सत्तेत आल्यावर विरोधकांना नामोहरण करण्याची बाब राजकारणात नवी नाही. निवडून आल्यावर चारच महिन्यात नॉट रिचेबलचा टॅग लागलेल्या खासदार अमर काळे यांच्या ताब्यातील संस्था आता वक्रदृष्टीत आल्याचे दिसून येते. आष्टी बाजार समितीची उपशाखा म्हणून कारंजा बाजार समिती अस्तित्वात आली. त्यावर खासदार अमर काळे गटाचे वर्चस्व होते. आता कारंजा बाजार समिती बरखास्त करीत ही स्वतंत्र बाजार समिती म्हणून अस्तित्वात आली आहे.

आष्टी व कारंजा या दोन स्वतंत्र बाजार समित्या असाव्या, असा भाजपचा सातत्याने प्रयत्न सूरू होता. तत्कालीन आमदार दादाराव केचे यांनी विधिमंडळात पण दोन स्वतंत्र बाजार समित्या कराव्या, अशी मागणी लावून धरली होती. अखेर आता त्यास यश आले आहे. कारंजा उपबाजार समितीत खासदार काळे गटाचे सभापतीसह १४ तर भाजपचे ३ संचालक होते. हे संचालक मंडळ बरखास्त करीत जिल्हा उपनिबंधकांनी प्रशासक नियुक्ती केली. आता कारंजा व आष्टी या दोन स्वतंत्र बाजार समित्या म्हणून कार्यरत होणार असून सध्या आष्टीत गौतम धोंगडी तर कारंजा बाजार समितीवर संदीप भारती यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दोनच वर्षात संचालक मंडळ बरखास्त झाले. १५ दिवसापूर्वीच खासदार अमर काळे यांच्या पत्नी मयुरा काळे यांचा विधानसभा निवडणुकीत पराभव झाला आहे. केवळ कारंजा बाजार समितीतच सत्ता होती. ती सुद्धा आता गमवावी लागली असल्याने काळे गटास दुसरा धक्का बसला आहे.

आता आष्टी बाजार समितीचे कार्यक्षेत्र हे १५८ गावांचे तर कारंजा बाजार समितीचे कार्यक्षेत्र १२१ गावापुरते मर्यादित राहणार. आष्टीत दोन व कारंज्यात तीन कर्मचारी नियुक्त होणार असल्याचे बरखास्ती आदेशात नमूद आहे.

# श्रीक्षेत्र नृसिंहवाडीचा स्वतंत्र पार्किंग आराखडा गरजेचा

● कुरुंदवाड , सचिन कदम :


श्रीक्षेत्र नृसिंहवाडी हे राज्यातील एक मुख्य तीर्थक्षेत्र आहे. महाराष्ट्रासह गोवा, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, आंध— प्रदेश येथूनही भाविक दर्शनासाठी येतात. मात्र, भाविकांना जागेअभावी पार्किंगच्या समस्येला तोंड द्यावे लागते. वाहतुकीची कोंडी ही नित्याचीच झाली आहे. एका बाजूला कृष्णा, तर दुसऱ्या बाजूला पंचगंगा नदीमुळे पार्किंगसाठी प्रशस्त जागा मिळणे दुरापास्त झाले आहे. रस्ता वगळता अन्यत्र पार्किंग करता येत नाही, ही वस्तुस्थिती आहे. प्रशासनाने याबाबतचा दत्त जयंतीसाठी स्वतंत्र आराखडा तयार केल्यास हा प्रश्न सुटू शकेल. नृसिंहवाडी येथे बहुमजली पार्किंगलाही मर्यादा आहेत. जयंती काळात ते बंद ठेवावे लागते. पार्किंगचे नियोजन नसल्याने भाविक



वाहने दिसेल तिथे रिकाम्या जागेत लावतात. शिरोळ रस्ता, कुरुंदवाड रस्ता, औरवाड रस्ता येथे वाहने लावलेली दिसतात. त्यामुळे वाहतूक कोंडी होते. कर्नाटकातून येणारे भाविक पंचगंगा नदीवरील दिनकरराव यादव पुलावरून येतात. पुलावरही वाहतूक कोंडी नित्याचीच बनली आहे. या समस्येवर मार्ग काढण्यासाठी प्रशासनाने निश्चित आराखडा तयार करण्याची गरज आहे. नृसिंहवाडीत प्रवेश कमान अगदी नदीकाठावर आहे.

# वीजपुरवठ्यातील व्यत्ययामुळे पिके वाळली

● सातारा, दिगंबर जाधव:



शेत ओलितासाठी पदरमोड करुन शेतकऱ्याने शेतात विहीर खोदली. अनामत रक्कम भरुन वीज पुरवठाही घेतला. मात्र, कृषीपंपाला पुरेसा वीजपुरवठा नसल्याने रब्बी हंगामातील पिके वाळू लागली आहेत. यासंदर्भात वारंवार महावितरणला पत्रव्यवहार केला, निवेदने दिली. मात्र, त्यावर तोडगा निघाला नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. महावितरणकडून शेतकऱ्यांसाठी विविध योजना आहेत. पण, या सर्व योजनांपेक्षाही कृषीपंपाला पुरेसा वीज पुरवठा मिळाला तरी पुरेसे आहे, अशी शेतकऱ्यांची माफक मागणी आहे. महावितरणकडे अनामत रक्कम भरुन वीज जोडणी घेतली. हजारो रुपये खर्च करुन मोटरपंप आणि आवश्यक साहित्यही खरेदी केले. मात्र, देण्यात आलेल्या वीजजोडणीला पुरेसा वीजपुरवठाच रहात नसल्याने पाण्याची सोय असताना पिकांना पाणी मिळत नाही. याची तक्रार महावितरणकडे करण्यात आली होती, असे शेतकरी सांगत आहेत.